अस्सल सोलापुरी

# सुराज्य सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. १३ ऑगस्ट २०२४ । वर्ष : २२ वे अंक : ३१५ वा किंमत : ५ रुपये पाने ८

## दहावी-बारावी परीक्षेच्या तारखा जाहीर

**पुणे** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून दहावी आणि बारावीच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील परीक्षांच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या काळात होणार आहे. तर, दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या काळात होणार, अशी माहिती महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे देण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया वेळेवर होणे, व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षा या मंडळाच्या परीक्षेनंतर आयोजित केल्या जात असल्याने अशा परीक्षांचा अभ्यास करण्यास विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ मिळावा तसेच पुरवणी परीक्षा लवकर घेवून त्याचा निकाल लवकर जाहीर करणे, या बाबींचा विचार करुन सन २०२५ ची फेब्रुवारी- मार्चमध्ये घेण्यात येणारी दहावी आणि बारावीची परीक्षा नेहमीपेक्षा १८ ते १० दिवस आधी आयोजित करण्याचा मंडळाचा मानस असून त्याअनुषंगाने लेखी, प्रात्यक्षिक आणि इतर परीक्षा पुढील तारखांना घेण्याचे नियोजन असल्याचे मंडळाकडून सांगण्यात आले.

# डोक्यात-पोटात वार करून भविष्य सांगणाऱ्याचा खून

## मोहोळ तालुक्यातील पाटकूलजवळचा थरार - चिडलेल्या हॉटेलचालकाने दोन महिन्यांनी घेतला बदला

**मोहोळ/प्रतिनिधी**

**मोहोळ-टाकळी सिकंदर रस्त्यावरील पाटकूलजवळ एका हॉटेलचालकाने पूजापाठ व भविष्य सांगणाऱ्या इसमाचा अमानुषपणे खून करून तो पसार झाला आहे.रविवारी सायंकाळी सहाच्या सुमारास ही घटना घडली. मसले चौधरी येथे राहणारे विजयकुमार शिरसट असे खून झालेल्या त्या इसमाचे नाव आहे.दत्ता वसेकर (रा,टाकळी सिकंदर) असे त्या मारेकऱ्याचे नाव आहे. पैशाच्या कारणावरून वसेकर याने शिरसट यांच्या डोक्यात व पोटात चाकूने वार करून त्यांची हत्या केल्याचे पोलिसांनी सांगितले. वसेकरच्या शोधासाठी ठिकठिकाणी पोलिसांचे पथक पाठवण्यात आले आहे.**



### अनेक प्रश्नांची चर्चा...

वसेकर हा दोन वर्षांपूर्वी शिरसट यांच्याकडे आला होता. त्यांच्या भाकितातून वसेकरने उपाय केले आणि हॉटेल उत्तम चालू लागले. नंतर या दोघांमध्ये असे काय भिनसले की,वसेकर हा शिरसट यांच्यावर चिडून होता. तुझ्यामुळे माझ्या घराचे वाट्टोळे झाले,अशा शब्दात वसेकने शिरसट यांना धमकी का दिली,असे नानाविध प्रश्न पाटकूलच्या ग्रामस्थांकडून उपस्थित केले जात आहेत.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, विजयकुमार शिरसट हे कुटुंबासमवेत मोहोळ तालुक्यातील मसले चौधरी येथे राहतात. ते दत्तगुरुची पूजा-अर्चा करायचे तसेच विचारायला आलेल्या लोकांना ते भविष्य सांगत असत. लोकांच्या घरातील तसेच व्यवसाय करणाऱ्यांसाठी त्यांच्याकडून बरे-वाईट माहिती सांगितली जात असत. त्यामुळे लोकांचा त्यांच्यावर विश्वास बसला होता. म्हणून अनेक लोक त्यांच्याकडे ये -जा करत होते. गेल्या दोन वर्षांपूर्वी मोहोळ तालुक्यातील टाकळी सिकंदर येथील हॉटेल व्यवसायिक दत्ता वसेकर हा शिरसट यांच्याकडे गेला होता. त्यावेळी त्याने त्यांच्या घरातील अडचणी व हॉटेल व्यवसाय चालत नव्हता असे सांगितले. त्यावर शिरसट यांनी उपाय सांगितल्यावर त्याचा त्याला फायदा झाला. म्हणून वसेकर हा परत परत शिरसट यांच्याकडे येऊ लागला.

त्यातच वसेकर यांची पत्नी एक वर्षांपूर्वी मयत झाली होती व त्यातूनच तो थोडा तणावात होता. त्याचा व्यवसायही हळूहळू चालत होता. म्हणून वसेकर हा शिरसट यांच्या घरी दोन महिन्यांपूर्वी येऊन गेला होता. वसेकर याचा फोन आल्यानंतर शिरसट हे मानसिक तणावात यायचे. त्यातूनच गेल्या दोन दिवसांपासून ते जास्तच मानसिक तणावात होते.

आपली पत्नी सुषमा शिरसट यांना विजयकुमार यांनी सांगितले होते की, वसेकर हा पैशाच्या कारणावरून धमकी देत होता. तुझ्यामुळे माझ्या घराचे वाटोळे झाले आहे, मी तुला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी देत होता. दरम्यान ११ ऑगस्ट रोजी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास विजयकुमार शिरसट हे घरातून (चिंचोली ता. पंढरपूर) येथे नातेवाईकांना भेटण्यासाठी दुचाकीवरून गेले होते.

तेथून परत येत असताना सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या दरम्यान वसेकर याने पाटकूल रस्त्यावरील त्याच्या हॉटेलजवळ विजयकुमार यांना हत्याराने डोक्यात वार करून आणि पोटात भोसकून त्यांचा खून करून पळून गेला.हा थरार पाहून तेथील लोकांमध्ये एकच खळबळ उडाली.अनेकांनी तेथून पळ काढला.पोलीस पाटलाने घटनास्थळी येवून ही खबर मोहोळ पोलीस ठाण्याला दिली.घटनास्थळी येवून पोलिसांनी शिरसट यांना मोहोळच्या ग्रामीण रूग्णालयात दाखल केले.उपचारापूर्वी त्यांचा मृत्यू झाला.

याबाबतीच फिर्याद पत्नी फिर्याद सुषमा शिरसट यांनी मोहोळ पोलीस ठाण्यात दिली असून पोलिसांनी दत्ता वसेकर याच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलीस निरीक्षक सुरेशकुमार राऊत करीत आहेत.

# एकेकाळचे परमशिष्य 'तुतारी' फुंकण्याच्या तयारीत

**सोलापूर/विशेष प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्याला राजकारणाला नवी कलाटणी मिळण्याची चिन्हे दिसत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गटाचे पक्षप्रमुख शरद पवार यांनी रविवारच्या बार्शीच्या दौऱ्यात मनाचा मोठेपणा दाखवल्याने एकेकाळी त्यांचा परमशिष्य असणारा बार्शीतील एक ज्येष्ठ नेता आगामी विधानसभेसाठी तुतारी हाती घेवून मैदानात उतरणार असल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. गुरू आणि शिष्य यांच्या दिलखुलास भेटीतून हा राजकीय तर्क काढला गेला आहे.

माजी मंत्री दिलीप सोपल हे बार्शी तालुक्यातील बडे राजकीय प्रस्थ. अनेक वर्षे त्यांनी काँग्रेस विचारधारा धरली होती पण काँग्रेसमध्ये शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसची वेगळी चूल मांडल्यानंतर सोपलांनी पवारांना साथ दिली. काँग्रेस एकसंध असताना सोपल पवारनिष्ठ म्हणून ओळखले जायचे. बार्शीत सोपलांनी तब्बल सहावेळ आमदारकी गाजवताना अनेक पराभव देखील पचवले आहेत. राजकीय यशासाठी त्यांनी दोन टर्म गुरूची पर्वा न करता पॅटर्न बदलला होता तरी या पवार-सोपल या गुरू-शिष्यांमध्ये कधीच अंतर पडले नाही

यंदाच्या मैदानात विद्यमान आमदार राजेंद्र राऊत यांना फाईट देणारा प्रतिस्पर्धी उमेदवार कोण याची उत्सुकता बार्शीकरांना लागलेली असतानाच पवार यांनी स्वतःहून बार्शीत सोपलांची घरी जावून भेट घेतली. २०१४ मध्ये सोपलांनी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून निवडणूक लढवली होती.राज्यात बदललेल्या राजकीय समीकरणांमुळे अस्वस्थ सोपल हे शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीत प्रवेश करणार असल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले. त्यांच्या निर्णयाने झाकोळलेल्या राजकीय कारकीर्दीला पुन्हा उभारी मिळेल,असे त्यांच्या कार्यकर्त्यांना वाटते. येत्या विधानसभा निवडणुकीत आमदार राजाभाऊ राऊत यांच्याविरोधात सोपल बार्शीतून तुतारी फुंकतील हे ओघाने आलेच! काहीच दिवसांत त्यांच्या प्रवेशाविषयी घोषणा करण्यात येईल, अशी माहिती आहे.

विधानसभा निवडणूक २०१९ च्या तोंडावर सोपल यांनी शरद पवार यांची साथ सोडून उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना पक्षात प्रवेश केला होता. त्यावेळचे अपक्ष उमेदवार आणि आताचे जवळपास भाजपवासी राजाभाऊ राऊत यांनी सोपल यांचा पराभव केला. मध्यंतरी सोपल यांच्या आर्यन साखर कारखान्याच्या एफआरपीची बिले थकीत होती. याविषयीची चौकशीही सुरू होती. त्यामुळे पराभवानंतर सोपल काहीसे शांत होते. शिवसेनेच्या कोणत्याही कार्यक्रमांना वा पक्षाच्या बैठकींनाही सोपल उपस्थिती लावत नव्हते. सरकारविरोधात काही भूमिका घेतली तर कारवाईची त्यांना भीती होती. लोकसभा निवडणुकीतही अगदी शेवटच्या टप्प्यात त्यांनी ओमराजे निंबाळकर यांच्यासाठी खुमासदार भाषण ठोकून एका भाषणात मते कशी वळवावीत, याचा नमुना दाखवला.



### तुतारीचा आवाज वाढेल


सोपल यांचे व्यक्तिमत्व म्हणजे सामान्य माणसांमध्ये रमणारे, सरकारविषयी सामान्यांमध्ये काय भावना आहे? हे यथोचित सांगणारे. सरकारचे निर्णय आणि भूमिका यांची सोप्या शब्दात चिरफाड करून जनसामान्यांमध्ये सरकारविरोधी लाट कशी निर्माण करायची ही टॅक्ट त्यांच्याकडे आहे. राष्ट्रवादीत फूट पडून काका-पुतण्यांनी वेगळी चूल मांडली. अशा काळात सोपल यांच्यासारखे नेते शरद पवार यांच्या साथीला आले, तर विधानसभा निवडणुकीत तुतारीचा आवाज नक्की वाढेल, असे राजकीय विश्लेषक सांगतात.

### कमबॅक करण्यास उत्सुक

राजकारणातील दिलखुलास, प्रचंड मिश्किल, हजरजबाबी आणि बेरकी व्यक्तिमत्व. आपल्या भाषणातून प्रतिस्पर्ध्यांना चितपट करणे असो वा पक्षांतर्गत विरोधकांना लगावलेल्या कोपरखळ्या असो, दिलीपरावांचे भाषण म्हणजे कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांसाठी हास्याची पर्वणीच असते. गेली ५ वर्षे राजकीय अज्ञातवासात गेलेले सोपल पुन्हा एकदा कमबॅक करण्यास उत्सुक असल्याचे सांगण्यात येते त्याची सुरुवात झालीये. शरद पवार यांच्या बार्शीतील भेटीने.

## जुनोनी हद्दीत मोटारसायकलच्या अपघातात एकाचा मृत्यू

**सांगोला** : करांडेवाडी ता.सांगोला येथील मोटासायकल चालकाचा अपघाता मध्ये मृत्यू. ही घटना रविवार दि.११ रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास जूनोनी शिवारातील आशीर्वाद हॉटेल समोर मिरज सांगोला रोडवर घडली.



**मयत मच्छिंद्र करांडे**

याबाबत पोलीससुत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, फिर्यादी कुंडलिक विष्णू करांडे याना दिनांक ११ रोजी सायंकाळी ६ वा.फोनवरून अशी माहिती मिळाली की फिर्यदीचा चुलता मच्छिंद्र अर्जुन करांडे यांचा जूनोनी हद्दीतील मिरज सांगोला रोडवर मोटासायकलचा अपघात झाला आहे.

फिर्यादी घटना स्थळी पोहोचण्या अगोदर १०८ ॲम्बुलन्समध्ये अपघातीस सांगोला ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु तेथील वैद्यकिय अधिकाऱ्यांनी मच्छिंद्र अर्जुन करांडे यांचा उपचारा पूर्वीच मृत्यू झाल्याचे सांगितले याबाबत पुतण्या कुंडलिक करांडे यांनी पोलिसात खबर दिली आहे.

## मुरारजी पेठेत चाकूने मारहाण

**सोलापूर** : किचनमधील लहान चाकूने छातीवर केलेल्या मारहाणीत नामदेव भारत जाधव (वय ३१, रा.मुरारजी पेठ) हा तरुण जखमी झाला. ही घटना रविवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास त्याच्या घराजवळील फर्निचर दुकानासमोर घडली. त्याला उपचारासाठी महेश गायकवाड (मामा) यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले. अभी आळंदकर याने त्याला मारहाण केली. अशी नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली. या मागचे कारण समजले नाही.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




'म्हणून' मी प्रॉपर्टी बनवत बसत नाही!

कल्याण
489-16-457
मुंबई
488-04-356

# एक उमेदवार ठरवा; विजय आपलाच होणार : जयंत पाटील

## मोहोळमध्ये शिवस्वराज्य यात्रेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**मोहोळ/प्रतिनिधी**

**शरद पवार यांच्यावर जेंव्हा जेंव्हा संकट आले, तेव्हा सोलापूरकर धावून आले आहेत. अनेक आमदार निघून गेले पण जनता आहे तिथेच आहे. सरकारला पराभव समोर दिसत असल्यामुळे विविध योजनांची खिरापत देत तिजोरी खाली करण्याच्या प्रयत्न होताना दिसत आहे. काहीही होऊ द्या एक उमेदवार ठरवा ,लोक आपल्या मागे आहेत. विजय आपलाच होणार असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील यांनी मोहोळ मध्ये केले.**

शिव स्वराज्य यात्रा सोमवारी मोहोळ येथे दाखल झाली, त्यानिमित्त मोहोळ येथील स्वातंत्र्य सेनानी संदीपान गायकवाड मंगल कार्यालय येथ सभेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी पाटील बोलत होते. याप्रसंगी खा. अमोल कोल्हे, खा. धैर्यशिल मोहिते-पाटील, महिबूब शेख, सुवर्णा शिवपुजे, बळीराम काका साठे, उत्तमराव जानकर, सुनील क्षीरसागर, संजय क्षीरसागर, पवन गायकवाड, विनय पाटील आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय क्षीरसागर यांनी केले यावेळी त्यांनी मोहोळ विधासभा मतदार संघातील परिस्थिती मांडली. खा. धैयशील मोहीते पाटील यांनी खा. प्रणिती शिंदे यांना ६३ हजार मताधिक्य दिल्याबद्दल मोहोळच्या जनतेचे आभार मानले व मताची विभागणी होवू नये यासाठी बंडखोरी चालणार नाही ती पक्षाला परवडणार नाही, महाविकास आघाडी च्या माध्यमातून जे उभा राहतील ते जनता निवडून देणार आहे तसे जनतेने ठरवलेल आहे. लोकसभेला जस मनावर घेतलं तसेच विधानसभेलाही मनावर घ्या.

यावेळी जानकर यांनी नाव घेता राजन पाटील यांच्यावर टीका केली. शरद पवार यांच्या विचाराच्या उमेदवारास मतदान करा असे आवाहन महेबुब शेख यांनी केले. शेवटी संजय क्षीरसागर यांचा वाढदिवसानिमित्त मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.




मोहोळ : शिव स्वराज्य यात्रेत बोलताना आ.जयंत पाटील.

### लोकसभेप्रमाणे विधानसभेलाही साथ द्या : खा.कोल्हे

खा. अमोल कोल्हे म्हणाले, कांद्याला भाव नाही, सोयाबिनला भाव नाही, शेतकरी वरचेवर अडचणीत येवू लागलाय भाजपावाले वेगवेगळ्या योजना काढून तिजोरी रिकामी करत आहेत. आमचा योजनांना विरोध नाही परंतु त्याचा हेतु चांगला पाहिजे, तो चांगला नाही. योजने मागचा हेतू लक्षात घेतला पाहिजे असे सांगत पवार यांच्यासोबत केलेली गद्दारी महाराष्ट्र विसरला नाही लोकसभेला आपण भरभरून मतदान केले विजय झाला म्हणून गाफील राहू नका, विधानसभेलाही साथ द्या.

## बुधवार पेठ परिसरात इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर** : बुधवार पेठ परिसरातील वीर फकीरा चौकाजवळ राहणाऱ्या एका ४७ वर्षीय इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सोमवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली. पांडुरंग सुखदेव कसबे (वय ४७ रा.वीर फकीरा चौक) असे मयताचे नाव आहे. आज दुपारी ३ वाजेच्या सुमारास त्याने राहत्या घरातील छताच्या लाकडी वाशाला साडीच्या सहाय्याने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून नातेवाईकांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला.

## ब्लेडने हातावर वार; विवाहिता जखमी

**सोलापूर** : पती नांदविण्यास नेत नसल्याच्या कारणावरून वर्षा राजपाल वाघमोडे (वय २८, रा. मुकुंद नगर, भवानी पेठ) या विवाहितेने राहत्या घरात डाव्या हातावर ब्लेडने वार करून जखमी झाली. ही घटना आज सोमवारी पहाटे २ वाजेच्या सुमारास घडली. तिला उपचारासाठी विजया कांबळे (आई) यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद जोडभावी पेठ पोलिसात झाली आहे.

# पवारांना आली जाग

ज्येष्ठ नेते शरद पवार हे मराठा आणि ओबीसी आरक्षणासाठी मैदानात उतरणार आहेत म्हणे. तशी घोषणा खुद्द त्यांनीच केली आहे. मराठा आरक्षणाच्या बाबतीत जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटीचे मनोज जरांगे पाटील यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. प. महाराष्ट्रात त्यांच्या शांतता रॅलीला मिळालेला प्रतिसाद राज्याने पाहिला आहे तर ओबीसी कोट्यातून मराठा समाजाला आरक्षण देताच कामा नये, अशी खमकी भूमिका राज्याचे मंत्री असलेले छगन भुजबळ यांनी घेतली आहे.निवडणुका तोंडावर आल्या की, एखाद्या सामाजिक प्रश्नावर तवा तापवायचा आणि त्यावर राजकीय पोळी भाजून घेण्याचा सरळसोट धंदा राजकीय पक्षांच्या प्रमुखांकडून सुरू आहे. हे आताचे नाही तर बऱ्याच वर्षांपासून चालत आले आहे. याला कुठलाही राजकीय पक्ष अपवाद नाही. तो प्रश्न सुटला काय नाही सुटला काय, त्याच्याशी राजकारण्यांना काही देणे घेणे नसते. केवळ आपली पोळी भाजली तर बस्स. लोकसभा निवडणुकीत जरांगे यांच्या आंदोलनाचा आम्हाला लाभ झाला, असा दावा महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून केला गेला. विधानसभेचे घोडामैदान जवळच आहे तेव्हा जरांगेंचे हे आंदोलन असेच सुरू रहावे, असे महाविकास आघाडीच्या नेत्यांना मनोमन वाटतही असणार. कारण दोन महिन्यात आमचीची



सत्ता येणार, असे महाविकास आघाडीचे नेते अगदी छातीठोकपणे सांगू लागले आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांना मराठा आणि ओबीसी हे दोनही वर्ग आवश्यक आहेत. यातील एका दुखावून चालणार नाही. सत्तेचा कौल देणारी त्यांची मते आहेत. हे राजकारण्यांना चांगले ठाऊक आहे. त्यामुळे मराठा आणि ओबीसीवरून जरांगे आणि भुजबळ यांच्या अगदी एकेरीवरून जेव्हा संघर्ष झाला, तेव्हा सर्वच राजकीय पक्षांचे प्रमुख या वादात पडले नाहीत हे विशेष. कारण कुणाचा रोष घ्यायचा नाही, या त्यांचा रोल होता. आता ओबीसी वर्ग आपल्या हातून जाऊ नये म्हणून ओबीसी आरक्षणाच्या लढ्यात बंचित बहुजन आघाडीचे संस्थापक ॲड. प्रकाश आंबेडकर हेही उतरले आहे. महायुतीने देखील मराठा आणि ओबीसी वर्गाची मर्जी सांभाळण्याचा पुरेपूर प्रयत्न करत आहे. कुणाला सत्तेत ठेवायचे आणि कुणाला बाहेर, याचा फैसला जनताच करणार आहे. ही सारी पार्श्वभूमी आपल्याला आम्ही मुद्दामून सांगितली. कारण पवारांनी मैदानात उतरताना मराठा आणि ओबीसी या दोनही समाजाचा उल्लेख केला.पवार हे तसे मुरब्बी नेते. कुणापासून आपल्याला फटका बसेल हे पवार चांगलेच जाणून आहेत. इतक्या वर्षाच्या राजकारणाचा त्यांना अनुभव आहे.आज जरांगे ज्याप्रमाणे पायाला भिंगरी लावली आहे,त्याप्रमाणे पवार हे देखील राज्याचा दौरा करत आहेत. निवडणुकीच्या तोंडावर नेत्यांनी दौरा करण्यात काहीच गैर नाही. कारण लोकांचा कौल घेणे त्यांचे कर्तव्यच ठरत असते. पवार म्हणतात, 'मीच आता आरक्षणासाठी मैदानात उतरणार आहे. बरे झाले. आरक्षणाचा प्रश्न सत्तेशी आणि आंदोलनाशी निगडित नाहीच. कोर्टाच्या दालनातूनच तो मिटणार आहे अन्यथा नाही. राज्य सरकारने दोनदा मराठा समाजासाठी आरक्षण दिले. आंध्रात जगनमोहन रेड्डी सरकारने मुस्लीम समाजासाठी ५ टक्के आरक्षण दिले.त्याचे काय झाले.हे सारा देश जाणतो. नितीशकुमार यांनी तोच आगावूपणा केला आणि तेही तोंडावर आपटले. देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारकडून मराठा समाजासाठी दिलेले आरक्षणही फसले. त्यानंतर महाविकास आघाडीचे सरकार आले. या सरकारने आरक्षणासाठी प्रयत्नच केले नाहीत. या सरकारचा वेळ करोनावर नियंत्रण मिळवण्यातच गेला. फडणवीस सरकार असताना मराठा समाजाचे मोठमोठे मोर्चे निघाले. मात्र, आघाडी सरकार आल्यानंतर मोर्चे थंडावले. महायुतीचे सरकार आल्यानंतर जरांगेंचे आंदोलन सुरू आहे. यावरून एक गोष्ट लक्षात यायला हवी. आंदोलने कुणाची सत्ता असताना व्हायला लागले आहेत. पवार सत्तेत असले की, सारे काही थंडावते तर ते विरोधात आले की, आंदोलने व्हायला लागतात. सामान्यांमधून अशी जी चर्चा झडते आहे ती अयोग्य कशी म्हणायची. पवार राज्याच्या आणि केंद्रीय सत्तेत किती वर्षे होते. आरक्षणाचा प्रश्न का सुटला नाही. सत्तेत असताना प्रश्न सुटतो, असे पवारांनाच वाटत असेल तर त्यांच्या सत्तेच्या काळात त्यांनी का प्रयत्न केले नाही. हा जाब त्यांना विचारण्याची गरज आहे. सत्तेतून आरक्षणाचा प्रश्न मिटणार नाही हे त्यांनाही ठाऊक आहे. मात्र, तापलेल्या तव्यावर पोळी भाजून घेण्याचा त्यांचाही उद्योग सुरू आहे. आरक्षणावर पवारांना आताच कशी जाग आली हा समाजातील जाणकारांचा प्रश्न आहे.

---

## क्रीडा जगत

# ...अन् शत्रूत्वाच्या ठिकऱ्या उडाल्या

**नीरज चोप्रा याची आई सरोज देवी तसेच अर्शद नदीमची आई रझिया परवीन सध्या चर्चेत आहेत. पॅरिसच्या ऑलिम्पिकमध्ये पाकिस्तानचा अर्शद नदीमने सुवर्णपदक जिंकले आणि भारताच्या नीरजने रौप्य पदक मिळवले. यावरून या दोन्ही मातांनी एकमेकांच्या मुलांचं अगदी मनमोकळे कौतुक केलं. त्यासाठी त्यांना भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांच्या सीमा आडव्या आल्या नाहीत. वास्तविक सरोज देवी पाकिस्तानला आणि रझिया परवीन यांनी भारताविरुद्ध काही वक्तव्य केलं असतं तरी त्या देशप्रेमी ठरल्या असत्या. पण त्या सवंग 'न बोलता मन की बात' बोलल्या म्हणूनच दोन्ही देशांतील शत्रूत्वाच्या भिंतीच्या ठिकऱ्या उडालेल्या सर्वांनी पाहिल्या. आता ही भिंत पुन्हा उभी राहू न देण्याची जबाबदारी सर्वांची आहे.**

---

कला आणि खेळ यांना सीमा नसतात, असं नेहमी बोललं जातं. त्यामुळे जगात कुठलाही कलाकार कुठेही गेला तरी त्याला मानसन्म ान दिला जातो. तसंच खेळाडूंचंही होतं. खेळात हार-जीत होत असते तरीही खिलाडूवृत्ती खूप महत्त्वाची असते. आपण हरल्यानंतरही विजेत्याचं मनापासून अभिनंदन करणं ही खरी खिलाडूवृत्ती आहे. तसंच आपण जिंकल्यानंतर समोरच्याला न खिजवता त्याच्या हिम तीला दाद देणं, त्याचा आदर करणं यालाही खिलाडूवृत्तीच म्हणतात. हे सर्व सांगण्याचं कारण म्हणजे ही खिलाडूवृत्ती अनेकदा दिसत नाही. मात्र, या खिलाडूवृत्तीचं दर्शन घडवलं आहे दोन मातांनी. या दोन माता म्हणजे एक भारतातील तर दुसरी पाकिस्तानातील. निमित्त झाले भालाफेकमधील सुवर्णपदकाचं! पॅरिस ऑलिम्पिकमधील भालाफ ेक स्पर्धेत पाकिस्तानच्या अर्शद नदीमने ९२.९७ मीटर भाला फेकून ऑलिम्पिकमध्ये नवीन विक्रम प्रस्थापित केला. सोबत सुवर्णपदकावरही नाव कोरलं. त्या खालोखाल भारताच्या नीरज चोप्रानं ८९.४५ मीटर अशी त्याची सर्वोत्तम कामगिरी करत रौप्य पदक मिळवले. यानंतर दोन्ही देशांमध्ये विजयाचा जल्लोष झाला. अर्शद आणि नीरज यांच्या आई आणि नातेवाईकांना माध्यमांनी बोलतं केलं. याबाबत प्रश्न विचारले आणि दोघींनी जे उत्तर दिलं त्यामुळे दोन्ही देशांत 'दिल से' असं वातावरण तयार झालं आहे.

८ ऑगस्ट तसा खास दिवस होता. भारताला नीरज चोप्राकडून खूप अपेक्षा होत्या. अगोदरच्या ऑलिम्पिकमध्ये नीरजने सुवर्णपदकाची कमाई करून आणि त्यानंतरही इतर स्पर्धांमधील त्याच्या जबरदस्त कामगिरीने त्याने भारतीयांच्या अपेक्षा वाढवल्या होत्या. प्रत्यक्षात पाकिस्तानच्या अर्शद नदीमने बाजी मारली आणि ऑलिम्पिकमध्ये तब्बल ३२ वर्षांनंतर पाकिस्तानला सुवर्णपदक मिळवून दिलं, तेही वैयक्तिक. १९९२ मध्ये पाकिस्ताननं हॉकीमध्ये सुवर्णपदक मिळवलं होतं. त्यामुळे अर्शदचं पदक म्हणजे अख्ख्या पाकिस्तानचा गौरव, सन्मान म्हणावा लागेल. असं जल्लोषाचं वातावरण असताना हरयाणातील पानिपतमध्ये राहणाऱ्या नीरज चोप्राच्या घरी माध्यमांचे प्रतिनिधी पोहोचले आणि नीरजच्या आईला म्हणजेच सरोज देवी यांना त्यांचा पहिला प्रश्न होता, पाकिस्तानला सुवर्णपदक मिळालं आणि नीरजला रौप्य पदक. तुमची प्रतिक्रिया काय? त्या मातेनं




क्षणाचाही विलंब न लावता, सुवर्णपदक मिळवणाराही माझाच मुलगा आहे. रौप्य पदकही आम्हाला सुवर्णपदकासारखेच आहे आणि कांस्य पदक मिळवणाऱ्याचंही कौतुक करत ते तिघेही खेळाडू आहेत, अशी प्रतिक्रिया दिली. या त्यांच्या प्रतिक्रियेने केवळ भारतातच नाही तर पाकिस्तानसह जगभरात सकारात्मक प्रतिक्रिया उमटल्या. त्याचवेळी सीमेपलीकडे पाकिस्तानमधील पंजाब प्रांतातील खानेवाल जिल्ह्यातील मियाँ चन्नू या गावातही जल्लोष सुरू होता. हे अर्शद नदीचं गाव आहे. या गावात अक्षरश: दिवाळीसारखं वातावरण झालं आहे. तिथं माध्यम ांनी अर्शद नदीमची आई रझिया परवीन यांची प्रतिक्रिया विचारली. खास करून भारताचा नीरज चोप्राला हरवल्याबद्दल त्यांनी प्रतिक्रिया विचारली. त्यावर त्या माऊलीनेही नीरज चोप्रा, त्याची आई आणि कुटुंबीयांचं अभिनंदन करून विजय-पराजय हा नशिबाचा भाग आहे, तोसुद्धा माझाच मुलगा आहे, अल्लाह त्याला यश देवो, तो नदीमचा भाऊच आहे, असं उत्तर दिलं.

वास्तविक या दोन्ही माता एकमेकींना कधीही भेटलेल्या नाहीत. रझिया परवीन यांनी दिलेली प्रतिक्रिया ही सरोज देवी काय म्हणाल्या हे ऐकू दिली नव्हती. तर दोन्ही मातांच्या प्रतिक्रिया अतिशय उत्स्फूर्त होत्या. दोन्ही देशांतील जनतेनं, खेळाडूंनी त्यांचं स्वागत केलं आणि १९४७ पासून दोन देशांमधील असलेली शत्रूत्वाची भिंत कोसळून पडल्याची जाणीव सर्वांना झाली. वास्तविक भारत आणि पाकिस्तान यांच्यात कुठलाही सामना असला की, त्याला शत्रूत्वाचा रंग दिला जातो. मात्र, या दोन्ही मातांनी असं काहीही न बोलता ही आमचीच मुले आहेत, असं वक्तव्य करून दोन देशांत सौहार्दाचे वातावरण निर्माण केले आहे. ते यापुढे दोन्ही बाजूंनी जपायला हवे. गंमत म्हणजे या स्पर्धेनंतर म्हणजे अर्शदला सुवर्णपदक आणि नीरजला रौप्य पदक प्रदान केल्यानंतर दोघांच्याही प्रतिक्रिया अशाच स्वरुपाच्या होत्या. भालाफेकमधील सुवर्णपदक पाकिस्तानला आणि रौप्य भारताला, हा प्रश्न विचारणाऱ्याला काही वेगळं उत्तर अपेक्षित असावं. प्रत्यक्षात भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांनी पॅरिसमध्ये चांगली कामगिरी केली. आमची मैत्री अशीच राहू दे, असे अर्शद नदीम म्हणाला. तर अर्शदचे अभिनंदन, आमच्यात अशीच स्पर्धा होऊ दे, ही प्रतिक्रिया नीरज चोप्राची होती. या दोघांनीही अत्यंत उत्स्फूर्तपणे हे सांगितले. सुवर्णपदक हुकलं याची खंत नीरजला होती मात्र, त्यानं आणि अर्शदनेही खिलाडूवृत्तीचं दर्शन घडवलं. भारतीय क्रिकेटपटू युवराज सिंगने नीरजचे अभिनंदन करताना आवर्जून अर्शदचेही कौतुक केले. हरभजन सिंगनेही अर्शदचे कौतुक केले. पाकिस्तानी खेळाडूंनीही असाच सकारात्मक प्रतिसाद दिला.

अर्शद नदीम हा खरोखरच जिगरबाज खेळाडू आहे. क्रिकेट हे त्याचे पहिले प्रेम होते. त्यानंतर हॉकी, फूटबॉल, बॅडमिंटन आणि कबड्डीचं मैदान गाजवल्यावर तो भालाफेकीकडे वळला. नदीमच्या पॅरिस ऑलिम्पिकमधील सुवर्णपदकाच्या यशानंतर दोन्ही देशांमधील राजकीय वातावरण बऱ्यापैकी निवळले आहे. त्यामुळे हीच संधी साधून दोन्ही देशांनी एकमेकांशी सहकार्याचा हात पुढे केला तर दोन्ही देशांच्या भल्याचे होईल.

**- अविनाश चांदणे.**

---

## टुडेज् ब्लॉग

# दलित वस्त्यांची दूरवस्था

महाराष्ट्र राज्यातील दलित वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा पुरवून तेथील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी सन १९७४ पासून दलित वस्ती सुधार योजना सुरू करण्यात आली. या योजनेच्या नावात बदल करून सध्या ही योजना अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तींचा विकास करणे या नावाने राबवली जात आहे. राज्यातील दलित वस्त्यांमध्ये ही योजना राबविली गेली तरी आज बऱ्याच गावातील दलित वस्त्यांकडे पाहिल्यावर या वस्त्या आजही शासकीय योजनांपासून वंचित आहेत असेच म्हणावे लागेल. सध्या आपल्या राज्याला सामाज कल्याण मंत्रीच नाही ही पुरोगामी समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्याची शोकांतिका म्हणावी लागेल. मग सांगा राज्यातील दलित समाजाचे कल्याण होणार कसे? या प्रश्नाचा विचार राज्यातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी करणे गरजेचे आहे.

आपल्या राज्यातील दलित समाजाचा विकास होण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून सन १९९९ पासून रुपये ५ लाख अनुदान देण्यात येत होते. त्यानंतर १४ नोव्हेंबर, २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार लोकसंख्येच्या निकषाप्रमाणे रुपये १० लाख अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. ५ डिसेंबर २०११ रोजी घेण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार लोकसंख्येच्या प्रमाणात रुपये २ लाख ते रुपये २० लाखांपर्यंत अनुदान देण्यात येणार होते. राज्यातील लोकसंख्येच्या प्रमाणाचा विचार करता वाडीत १० ते २५ लोकसंख्या असेल, तर रुपये २ लाख, २६ ते ५० लोकसंख्या असल्यास रुपये ५ लाख, ५१ ते १०० लोकसंख्या असल्यास रुपये ८ लाख, १०१ ते १५०, १५१ ते ३०० आणि ३०१ च्या पुढे अनुक्रमे १२, १५ आणि २० लाख रुपये अनुदान देण्यात येणार आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार कोकणातील ग्रामीण भागातील अनुसूचित जातींची लोकसंख्या २,५५,५५३ तर राज्यातील एकूण ग्रामीण भागातील लोकसंख्या ७४,९४,८१९ होती.



दलित वस्ती सुधार योजनेचा मुख्य उद्देश अनुसूचित जाती व नव बौद्ध घटकांच्या वस्तीचा सर्वांगीण विकास करणे होय. मात्र काही दलित वस्त्या सोडल्या तर आजही कित्येक दलित वस्त्या शासकीय योजनांपासून वंचित आहेत असेच म्हणावे लागेल. यातील कित्येक नागरिक शहरात तसेच इतर गावांमध्ये जाऊन स्थायिक झालेले आहेत.


दलित वस्त्यांचा विचार करता दलित वस्त्या गावकुसाबाहेर असल्याने गावातील मुख्य रस्ता ते दलित वस्ती असा रस्ता असला पाहिजे. त्याला दोन्ही बाजूने गटार असायला हवे. पाणीपुरवठा, वीज पुरवठा, समाज मंदिर, विहीर, स्मशानभूमी, रस्त्याचे डांबरीकरण करणे, उघड्या विहिरींवर कठळे बांधणे, वस्तीच्या बाजूला नदी असल्यास संरक्षण भिंत बांधणे, वस्तीत जाताना नाला असल्यास नाल्यावर पूल बांधण्यात यावे. विहीर दुरुस्ती तसेच स्वच्छ पिण्याच्या पाण्यासाठी सोयी-सुविधा, पाण्याची टाकी दुरुस्त करणे, सार्वजनिक उपयोगासाठी मुताऱ्या व शौचालय बांधणे, रस्त्याच्या बाजूला विजेचे दिवे लावणे, अंगणवाडी सुरू करणे, बगीचे तयार करणे, बसण्यासाठी बाक ठेवणे, खेळाचे साहित्य देणे, समाज मंदिर, वाचनालय, व्यायामशाळा, दवाखाने, सांस्कृतिक केंद्र, दुकाने अशी अनेक सार्वजनिक हिताची कामे केली जातात. तसा प्रस्ताव तयार करून ग्रामपंचायतीमार्फत जिल्ह्यातील समाज कल्याण विभागाकडे पाठविण्यात येतो. मी महाविद्यालयात असताना विहीर चोरीला गेली? रस्ता चोरीला गेला? अशा बातम्या वाचायला मिळत असत. मात्र नेमके काय झाले याची कल्पना येत नसे. नंतर चौकशी केल्यावर लक्षात यायचे की, कोणत्याही प्रकारचे काम न करता कागदोपत्री शासकीय योजना राबवून अनुदान लाटले गेले आहे. किती दुर्दैव राज्याचे म्हणावे लागेल. अशा वेळी योग्य ती कायदेशीरपणे कारवाई होणे आवश्यक आहे. तेव्हा शासकीय अनुदान लाटणाऱ्या अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई झाली असती, तर आज नवीन संसदेमध्ये अधिवेशन चालू असताना विरोधकांना नीट म्हणण्याची वेळ आली नसती. तेव्हा कोणत्याही शासकीय योजनांची नीट अंमलबजावणी केली जाते का याचे वर्षाच्या शेवटी मूल्यमापन होणे गरजेचे असते. झाले असते तर प्रशासकीय परीक्षा सुद्धा पारदर्शक झाल्या असत्या. हे केवळ दलित वस्त्यांसाठी मारक नाही तर देशाच्या विकासासाठी घातक आहे. आज दलित वस्त्यांच्या विकासासाठी अनेक योजना आहेत. मात्र त्या संविधानिक चाकोरीतून राबविल्या जात नाहीत. इतके शासकीय अनुदान असून सुद्धा आजही दलित वस्तीतील राहणाऱ्या नागरिकांना आपल्याला हक्काचे पाणी मिळण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करावे लागते.

**- रवींद्र तांबे.**

---

## जन्म हा अखेरचा

# भाजनस्थल



हे विश्व आपल्याला प्रचंड विस्तारलेले दिसते, परंतु परब्रह्मशिवासमोर ते एखाद्या अंकुराइतके लहान असते, हे या ठिकाणी सूचित केले आहे. शिव हा विश्वरूप आहे तसाच विश्वोत्तीर्ण देखील आहे, तो विश्वातीत देखील आहे. अनंत ब्रह्मांडाला आधारभूत असलेल्या विमर्शशक्तिपेक्षा शिव व्यापक असल्यामुळे त्याला येथे भाजन असे म्हटले आहे. शिव आणि विमर्शशक्ती यांचा संबंध कसा आहे, हे यापुढील श्लोकात दृष्टांतरुपाने स्पष्ट केले आहे.

**यथा चन्द्रे स्थिरा ज्योत्स्ना विश्ववस्तुप्रकाशिनी। तथा शक्तिर्विमर्शात्मा प्रकारे ब्रह्मणि स्थिता ।।२०.३८।।**

चंद्राची प्रभा विश्व प्रकाशित करते. चंद्र आणि चंद्रिका (प्रभा) यांच्यात भेद नाही. चंद्र उगवला आणि चंद्रिका मागे राहिली, असे कधी घडत नाही. चंद्र उगवल्याबरोबर त्याचा प्रकाश सर्व पृथ्वीवर पसरतो.

चंद्रिका ही चंद्रातच स्थिर असते, त्याच्यापासून वेगळी नसते. त्याप्रमाणे विमर्शशक्ती परब्रह्म शिवाच्या ठिकाणी विद्यमान आहे, स्थिर आहे. चंद्र आणि चंद्रिका, पुष्प आणि गंध यांच्यातील संबंधाला 'अविनाभाव' संबंध म्हणतात. संबंध अनेक प्रकारचे असतात. संयोग संबंध, समवाय संबंध, संयुक्त संबंध, संयुक्त-समवेत संबंध, तादात्म्य संबंध इत्यादी. न्यायशास्त्र पाहिले तर त्यात संबंधच संबंध दिसतील. नैय्यायिकाजवळ जो जाईल त्याच्याशी तो संबंध जोडतो. काहीतरी संबंध जोडल्याशिवाय तो गप्प बसत नाही. म्हणून न्यायशास्त्राचे सर्वांशी संबंध असतात, मग भलेही ते प्रेमसंबंध असतील किंवा वादसंबंध. सर्व प्रकारचे संबंध जाणून घेण्यासाठी न्यायशास्त्राचा अभ्यास केला पाहिजे. संबंधाविषयी एक कथा सांगितली जाते. एक न्यायशास्त्री एकदा एका अपरिचित माणसाच्या घरी गेला.

यायशास्त्र्याला ओळख लागत नसते, कारण तो सगळ्यांशी काही ना काहीतरी संबंध जोडतोच. तो घरात गेला, बसला. घरधन्याने विचारले, तुम्ही कोण आहात? मी तुम्हाला ओळखले नाही. न्यायशास्त्री म्हणाला, मी कोण आहे, हे तुम्हाला माहीत नाही का? आपण दोघे संबंधी आहोत. घरधन्याला आश्चर्य वाटले. तो म्हणाला, 'आमचा तुमचा कधी संबंध झाला?


**(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

---

## जनमानस

# जगाला अण्वस्त्रापासून वाचविण्याची गरज

६ ऑगस्टला सुमारे ७५ वर्षांपूर्वी ६ ऑगस्टला १९४५ या दिवशी अमेरिकेने ॲटोमिक बॉम्बनी जपानमधील हिरोशिमा या शहरावर तुफान हल्ला केला. त्यानंतर ९ ऑगस्टपर्यंत हे हल्ले हिरोशिमा व नागासाकी या शहरावर होत राहिले. हे हल्ले हिरोशिमा शहरावर पॉल तिबेटस व नागासाकी शहरावर चार्लस स्वॅनी या पायलटनी केले.




या ॲटोमिक बॉम्ब हल्ल्यामुळे या दोन शहरातील निरपराध नागरीकांच्या मृत्यूची संख्या कित्येक लाखाच्या घरात होती. कित्येक नागरीक कायम चे अधू व अपंग झाले. मृत्यूपैकी निम्मे अधिक नागरीक पहिल्या दिवशीच हल्ल्यातच मृत्यू पावले. साऱ्या जगाने एक मानवाने दुसऱ्या मानवांचा केलेला नरसंहार आपल्या डोळ्यांनी पाहिला. अमेरिका जपानला शरणागतीचा इशारा अनेक दिवस देत होती. पण जपानने त्यांची विनंती धुडकावून लाविली. अखेर प्रचंड नरसंहारानंतर जपानने १५ ऑगस्ट १९४५ ला शरणागती पत्करली. आज जगात एकूण आठ देशांनी अणुस्फोट घडवून आणले आहेत. त्यात भारताचाही समावेश आहे.

भारताचे धोरण अणुशक्तीचा उपयोग शांततेसाठी करण्याचा आहे. जगातील एखादे अण्वस्त्रधारी राष्ट्र त्याने हल्ला करून साऱ्या जगावर संकट आणू शकते. युध्द हा कोणतेही मार्ग सोडविण्याचा उपाय असू शकत नाही. युध्दाने कोणतेही प्रश्न सुटत नाहीत हेच जगाने दोन्ही महायुध्दातून अनुभविले आहे. युध्दे वाचविण्यासाठी व जगात शांतता नांदण्यासाठी जागतिक पातळीवर युनोची स्थापना झाली. अण्वस्त्रांचा उपयोग शांततेसाठी व मानवाच्या कल्याणासाठी होणे आवश्यक आहे.

**- शांताराम वाघ, पुणे.**

---

## श्रावणमास निमित्त

# सोलापूरचे ग्रामदैवत : श्री सिद्धरामेश्वर



सिद्धेश्वर तलाव : मल्लिकार्जुन मंदिरात अन्नछत्र उघडल्यानंतर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी, म्हणून मल्लिकार्जुन मंदिराच्या पूर्वेला तलाव खोदण्यास प्रारंभ केला. त्यावेळी शहरातील अनेक लोकांनी त्यासाठी आर्थिक मदत पुरविली. कष्टाला श्रमाला प्रतिष्ठा देणाऱ्या सिद्धरामांनी श्रमप्रतिष्ठेचा धडा घालून दिला आहे. स्वत: हातात पहार घेऊन तलाव खोदण्यास सुरुवात केली.

४ हजार लोकांनी उत्स्फूर्तपणे श्रमदान केले. तेव्हा सर्वोपयोगी तलाव निर्माण झाला. यामुळे सुमारे ९०० वर्षांपासून अनेक जीव जगले, जगत आहेत. कोणतेही काम पूज्यभावाने केल्यास आनंद मिळतो. त्यांच्या वचनात तलावाबद्दल ते म्हणतात, 'केरेयल्लिय तीर्थ, मनदल्लिय सर्वजीवद्यापरत्व मैदेगेदडे, निम्म पादसाक्षी, यन्न मनसाक्षी कपिलसिद्ध मल्लिकार्जुना ।'


या तलावातील पवित्र तीर्थ पूज्यभाव सोडणार नाही आणि माझे मन सर्व प्राणिमात्राबद्दल दया भाव सोडणार नाही, हे कधीही होणार नाही. याला तुमचे चरण, माझे मन साक्ष आहे कपिलसिद्ध मल्लिकार्जुना! अशा पूज्य भावाने त्यांनी कार्य केले. म्हणूनच सोलापूर (सोन्नलगी) हे आज पवित्र तीर्थक्षेत्र, शिवक्षेत्र म्हणून प्रसिद्ध झाले. त्यांनी शिवसानिध्यात श्रमपरिहार होऊन चित्तशांती मिळते, हे लोकांना पटवून दिले. सोलापूरच्या भूमीवरील सजीव आनंदाने जगावेत, त्यांचे जीवन सुखी व्हावे यासाठी या परिसरात त्यांनी निसर्गसृष्टी निर्माण केली.

**(क्रमश:)**

---

# रायटर अँड फायटर ऑफ महाराष्ट्र

भारताचे माजी राष्ट्रपती राधाकृष्णन यांनी आचार्य अत्रे यांचे वर्णन 'रायटर अँड फायटर ऑफ महाराष्ट्र' असे केले. आचार्य अत्रे यांचा जन्म १३ ऑगस्ट १८९८ रोजी झाला. प्रल्हाद केशव अत्रे हे महाराष्ट्रातील एक अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. साहित्य, शिक्षण, नाटक, चित्रपट, राजकारण. पत्रकारिता अशा विविध क्षेत्रांमध्ये त्यांनी आपला ठसा उमटवला.



आयुष्यातलं प्रत्येक गोष्टीबद्दल जिज्ञासा असणारे व्यक्तिमत्व म्हणजे प्रल्हाद केशव अत्रे. त्यांचे शिक्षण सासवड, पुणे, लंडन येथे झाले. लंडन येथे जाऊन टीडी (टीचर्स डिप्लोमा) घेणारे पहिले महाराष्ट्रीयन होते. भारतात येण्यापूर्वी हॅलो येथे त्यांनी अध्यापन केले होते. पुण्यातील कॅम्प एज्युकेशन सोसायटी शिक्षक म्हणून रुजू झाले. नंतर या शाळेचे ते मुख्याध्यापक झाले. नवयुग वाचनमालेद्वारे त्यांनी लिहिलेली शालेय पुस्तके हे शिक्षण क्षेत्रातील मोठे योगदान आहे.

त्यांनी एकूण २२ नाटके लिहिले. विनोद प्रधान नाटकांची नवी परंपरा त्यांनी घडवली. साष्टांग नम स्कार, मोरूची मावशी, लग्नाची बेडी, भ्रमाचा भोपळा ही त्यांनी लिहिलेली नाटके सदाबहार ठरले. निखळ विनोद हे त्याचा नाटकाचे वैशिष्ट्य होते. 'तो मी नव्हेच' हे त्यांचे नाटक ही प्रचंड गाजले. साने गुरुजींच्या कथेवर आधारित 'श्यामची आई'या चित्रपटाची निर्मिती व दिग्दर्शन त्यांनी केले. या चित्रपटाला राष्ट्रपतींचे सुवर्णपदक लाभलं.

दैनिक मराठा हे वृत्तपत्र त्यांनी सुरू केले. यात लिहिलेले अग्रलेख या दैनिकाचे बलस्थान होते. त्यांचे अग्रलेख अतिशय परखड व तिखट असत. प्रसंगी त्याला उपहासाची झालर असत. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात समाजात जागृती निर्माण करण्याचे काम त्यांच्या अग्रलेखाने केले. त्यांचं लेखन हे विविधरुपी होतं. प्रवास वर्णन, चरित्र, आत्मचरित्र, ललित साहित्य यांचा समावेश होता. 'मी कसा झालो' अशा आत्मकथन पुस्तकाबरोबर 'कऱ्हेचे पाणी' या आत्मचरित्राचे पाच खंड त्यांनी लिहिले. आचार्य अत्र्यांनी विडंबन या काव्य प्रकारची रुजवत केली. या प्रकाराला प्रतिष्ठाही मिळवून दिली. 'केशवकुमार' या टोपण नावाने त्यांनी विडंबन काव्य लिहिले. झेंडूची फुले या शीर्षकाने या विडंबन गीतांचा संग्रह त्यांनी प्रकाशित केला. या काव्यप्रकाराचा मराठी शालेय अभ्यासक्रमात समावेश केला गेला.

काय मौज आहे आयुष्य म्हणजे? तिला अंतच नाही; पण ती कोणाला? जो बघेल त्याला. जो भोगील त्याला. डोळ्यांना ढापणे बांधून घाण्याभोवती फिरणाऱ्या बैलांना कुठली आली मौज? जे रम्य आहे मी जे भव्य आहे त्याचे दर्शन खेडे गावातच घडते. पावलो पावली परमेश्वर तुमच्याशी बोलत असतो. त्याची कृपा नदीच्या रूपाने तुमच्या घरा जवळ वाहत असते. म्हणून शहरी जीवनात चैतन्य नसते. स्फूर्ती नसते. दारासमोरचा पेट्रोल पंप आणि चहाचे दुकान बघून कशी स्फूर्ती येणार? सात मजल्याच्या इमारती आणि गिरणीच्या उंच धुराडे ध्येयवाद कसा जागृत करणार? अशी त्यांची मांडणी जी प्रत्यक्ष लोकांना प्रभावीत करत.

आचार्य अत्रे यांच्या वाणीतून आणि लेखणीतून त्यांचं चतुरस्त्र व्यक्तिमत्व प्रकट होत असे. पुणे शहराचे नगरसेवकपद महाराष्ट्र विधानसभेचा आमदार देखील त्यांनी भूषवलं. १९४२ साली झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते.

**- अमोल भोसले, सोलापूर.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिषंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाच वेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR/२००२/०९७०७. Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णुपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य सोलापूर

। मंगळवार, दि. १३ ऑगस्ट २०२४ ।



## समर्थ नगर येथे दगडाने मारहाण; दोघे जखमी सोलापूर

**सोलापूर** : दगड आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत रोहित दुर्गादास पवार (वय २२) आणि समीर राजअहमद सय्यद (वय २५ दोघे रा.खड्डा तालीम) हे दोघे जखमी झाले. ही घटना रविवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास समर्थ नगर येथे घडली. त्यांना उपचारासाठी गणेश कामाठी (मित्र) याने शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यांना अज्ञात कारणावरून समर्थनगर येथे सोनू आणि अन्य ७ ते ८ जणांनी मिळून दगड आणि लाथा बुक्क्याने मारहाण केली. अशी नोंद सदर बझार पोलिसात झाली आहे.



# पक्ष फोडण्याचा विक्रम केल्याने पवारांना गोल्ड मेडल मिळेल



## देवेंद्र फडणवीस यांचा टोला

**मुंबई/प्रतिनिधी**

सगळ्यात जास्त पक्ष फोडण्याचा विक्रम त्यांच्याच नावावर आहे. देशामध्ये पक्ष फोडण्याची स्पर्धा घेतली तर पवारसाहेबांना गोल्ड मेडल मिळेल, असा टोला भाजप नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना लगावला आहे.

मुंबईमधील एका कार्यक्रमात बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात लागलेल्या निकालाबाबत आपले विश्लेषण केले. देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले की, लोकसभ निवडणुकीत शरद पवार यांच्याबद्दल लोकांमध्ये सहानुभूती होती, असे मला वाटत नाही. फक्त मीडियातील लोकांनाच पवार यांच्याबद्दल राज्यात सहानुभूती असल्याचे वाटतं आणि हेच लोक सतत सहानुभूतीचा धिंडोरा पिटत असतात. लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांनी अतिशय अनुभवाने आपल्या जागा निवडल्या आणि याचं क्रेडिट त्यांना द्यावंच लागेल. कुठे सरकारविरोधात वातावरण आहे, त्याचा अभ्यास करून त्यांनी जागा लढवल्या. विधानसभा निवडणुकीतही ते कमी आणि मोजक्याच जागा लढवतील, असे मला वाटते. परंतु त्यांच्याबद्दल महाराष्ट्रात सहानुभूती आहे, असं मला अजिबात वाटत नाही. कारण सहानुभूती असती तर बीडची जागा त्यांनी फक्त ६ हजार मतांनीच का जिंकली? पवार यांच्या पक्षाने मतांचं ध्रुवीकरण करून जागा जिंकल्या, असा आरोप फडणवीसांनी केला आहे.

### महत्त्वाकांक्षांमुळे पक्ष फुटले

पक्षफोडीच्या आरोपाबद्दल बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मी पुन्हा आलो, पण यावेळी दोन पक्ष फोडून घेऊन आलो, असे मी एकदाच आणि तेही गंमतीने बोललो. मात्र आम्ही सातत्याने हे सांगितलं आहे की कोणीही कोणाचे पक्ष फोडू शकत नाही. त्या त्या पक्षांतील महत्त्वाकांक्षांमुळे हे पक्ष फुटले आहेत.

### पुन्हा महायुतीची सत्ता येईल

महाविकास आघाडीबद्दल खरंच सहानुभूती असती तर आमच्यात आणि त्यांच्या फक्त झिरो पॉइंट तीन टक्क्यांच्याच फरक कसा असता? असा सवालही देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केला आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत फरक आहे. यंदा राज्यात पुन्हा महायुतीची सत्ता येईल, असेही फडणवीस म्हणाले.,

## संक्षिप्त वृत्त

### 'लक्ष' कॉन्फरन्ससाठी घनश्याम चव्हाण यांची निवड



**सोलापूर** : मारुती सुझुकी अरीना यांच्या जागतिक स्तरावरील लक्ष कॉन्फरन्ससाठी चव्हाण मोटर्सचे डायरेक्टर घनश्याम चव्हाण यांची निवड झाली असून, ते अझरबेजानमधील बाकू शहरात होणाऱ्या या कॉन्फरन्ससाठी रवाना झाले आहेत. या कॉन्फरन्ससाठी देशातील एक हजार डीलरमधून फक्त वीस डीलरांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील फक्त दोन डिलरची निवड झाली आहे. सोलापुरातील चव्हाण मोटर्सचे डायरेक्टर घनश्याम चव्हाण यांना मारुती सुझुकीने या कॉन्फरन्ससाठी निमंत्रित केले आहे. निवडीबद्दल चव्हाण यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. २०१० पासून मारुती सुझुकी डीलरशिपचा भाग असलेल्या चव्हाण मोटर्सने पहिल्या वर्षापासूनच देश-विदेशातील अनेक पारितोषिके पटकावली आहेत. अनेक कार्यक्रमांमध्ये त्यांनी बेस्ट डीलरशिप म्हणून पुरस्कार मिळवले आहेत. आता जागतिक स्तरावर लक्ष कॉन्फरन्सच्या माध्यमातून चव्हाण मोटर्स व घनश्याम चव्हाण यांनी आपली जागतिक ओळख निर्माण केली आहे. ग्राहक, मित्र, आणि सर्व हितचिंतकांकडून घनश्याम चव्हाण यांचे अभिनंदन होत आहे

---

### रेशन धान्य पुरवठा निरीक्षकावर कारवाई करण्याची मागणी

**सोलापूर** : पंढरपूर येथील रेशन धान्य पुरवठा निरीक्षक सदानंद नाईक यांच्यावर कारवाई व्हावी या मागणीसाठी जिल्हा परिषद दुकानदार संघटनेच्या वतीने दिनांक १५ ऑगस्ट पासून बेमुदत संपवर जाण्याचा इशारा दिला आहे. गेल्या काही वर्षांपूर्वी जिल्हा रेशन दुकानदार संघटनेने पुरवठा निरीक्षक सदानंद नाईक यांच्या कारभाराची पोलखोल केली होती. पण वरिष्ठाच्या मध्यस्थिने पडदा टाकण्यात आला होता.मात्र नाईक यांच्या कारभारात कोणतीच सुधारणा होत नसल्याने दुकानदार चांगलेच कोंडीत अडकले आहेत. खासदार प्रणिती शिंदे यांच्या गावभेटीदरम्यान नागरिकांनी या पुरवठा निरीक्षकाविरुद्ध तक्रारीचा पाढा वाचला होता. त्याप्रमाणे चौकशी समितीही नेमण्यात आली होती. पण अद्यापपर्यंत त्या चौकशी समितीचा अहवाल देखील बंद लखोट्यातच आहे. या सर्व प्रकारला वैतागूनच रास्त भाव धान्य दुकानदारांनी संपावर जाणार असल्याचा इशारा दिला आहे. यावेळी खजिनदार विजय गुप्ता, जिल्हाध्यक्ष सुनिल पेंटर, अभिजित सड्डो जुबेर खानमिया, हर्षल गायकवाड जिल्हा संपर्क प्रमुख नितीन पेंटर उपस्थित होते.

## महिलेच्या घरात प्रवेश करून अश्लील इशारे

**सोलापूर** : शहर परिसरातील एका नगरात एका ४० वर्षीय अनोळखी इसमाने पूर्णपणे नग्न अवस्थेत एका महिलेच्या घरात अनाधिकृतपणे केला.त्यानंतर त्या महिलेकडे पाहून अश्लील इशारे करून मनास लज्जा वाटेल असे कृत्य केल्याची फिर्याद पीडित महिलेने एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल केली आहे.त्या पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून अनोळखी इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ११ ऑगस्ट रोजी पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास घडली.

## फायटरने मारहाण तरुण जखमी

**सोलापूर** : जुळे सोलापुरातील भारती विद्यापीठाजवळ लोखंडी फायटरने केलेल्या मारहाणीत अब्दुल मुकसिन रऊफ चितापुरे (वय १८, रा.मुस्लिम पाच्छापेठ) हा तरुण जखम झाला. ही घटना सोमवारी दुपारी ४ वाजेच्या सुमारास घडली. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. साबीर बागवान आणि अन्य ६ जणांनी त्याला मारहाण केली.

## शाळांची तपासणी वाढवा, वस्तुनिष्ठ अहवाल सादर करा

### मनीषा आव्हाळे यांचे आवाहन



**सोलापूर** : प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख व डायट अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली उपशिक्षणाधिकारी व विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुखांनी शाळांची तपासणी भेटी वाढवून ऑनलाइन व ऑफलाइन वस्तुनिष्ठ अहवाल सादर करावा असे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी दिले आहेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी शाळांना स्वतः भेटी देऊन विद्यार्थ्यांची पेपर तपासणी केली असता पट चाचणी पेपरमध्ये अनेक चुका आढळून आल्या.

त्यामुळे डायटच्या अधिकाऱ्यांना पट संकलित चाचणी पेपर तपासणीचे निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने डायट अधिकाऱ्यांनी अनेक शाळांना भेटी देऊन पट चाचणीचे उत्तर पेपर तपासणी केली असता त्रुटी आढळलेल्या शाळांना भेटी देण्याच्या सूचना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी केल्या. जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये पेपर तपासणीमध्ये ५३ शाळेत अनेक त्रुटी आढळून आल्या. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी ५३ शाळेतील मुख्याध्यापकांची बैठक घेऊन त्यांना सक्त सूचना देऊन त्रुटींचे खुलासे गटशिक्षणाधिकाऱ्यांना सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

### मुख्याध्यापकांना कारणे दाखवा नोटीस द्या

डायट अधिकाऱ्यांच्या शाळा तपासणीत शिक्षक-मुख्याध्यापकांची पट चाचणीचे पेपर तपासणीमध्ये समाधानकारक कामगिरी नसल्याचे दिसून आले आहे. याबाबत वारंवार सूचना करुनही सुधारणा होत नसल्यास मुख्याध्यापकांना कारणे दाखवा नोटीस काढा असे आदेश आव्हाळे यांनी शिक्षण विभागाला दिले आहेत.

## पंढरपूर बसस्थानकात घाणीचे साम्राज्य

# आ. आवताडे संतापले; अधिकाऱ्यांना घेतले फैलावर

**पंढरपूर/प्रतिनिधी**

पंढरपूर बस स्थानक परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले असून स्वच्छ पिण्याचे पाणी देखील उपलब्ध नाही. जागोजागी घाण व कचरा साठलेला आहे. या सर्व बाबी पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी अचानक पंढरपूर बस स्थानकाला भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. हा परिसर पाहून आ.आवताडे चांगलेच संतापले. त्यांनी परिसर तातडीने स्वच्छ करण्याचे आदेश देत अधिकाऱ्यांना फैलावर घेतले.



पंढरपूर : बसस्थानकाची पहाणी करताना आ. समाधान आतवाडे. सोबत अधिकारी आणि प्रवासी दिसत आहेत.

आ. आवताडे बसस्थानकात आल्यावर शौचालय, पिण्याचे पाणी, फलाट, तसेच बस स्थानकाच्या बाहेर आणि आपली बाजूस असलेले व्यापारी गाळे, या ठिकाणी जागोजागी कचरा व घाण साठलेली पाहायला मिळाली. त्यामुळे आमदार समाधान आवताडे चांगलेच संतप्त झाले आणि त्यांनी महामंडळ अधिकाऱ्यांना फैलावर घेतले. यावेळी त्यांच्यासोबत प्रांत अधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, पंढरपूर शहर चे पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, नगर परिषदेचे उपमुख्य अधिकारी सुनील वाळुंजकर, परिवहन महामंडळाचे वाहतूक निरीक्षक दळवे, यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

### ... तर कंत्राटदारावर कारवाई करा

आ. आवताडे आगारात आल्यावर आगार व्यवस्थापक आणि स्थानक प्रमुख गैरहजर होते. त्यांना आ. आवताडे यांनी फोन करून स्वच्छता कंत्राटदार कोण आहे आणि तो योग्य पद्धतीने त्याचे काम करत नसेल तर त्याच्यावर कारवाई का केली जात नाही असा सवाल केला कचरा एका आठवड्यात पूर्णपणे स्वच्छ करून घ्या मी पुढच्या आठवड्यात पुन्हा येईन, असे सांगत कामे लवकर करण्याच्या सूचना केल्या.

## उपोषणास बसलेल्यातील एकाची तब्बेत बिघडली

### अप्पर तहसील रद्दसाठी मोहोळमध्ये मशाल मोर्चा

**मोहोळ** : अनगर येथे झालेले अप्पर तहसील कार्यालय रद्द च्या मागणीसाठी उपोषणास बसलेल्या ४ तरुणांपैकी संतोष सोलनकर याची तब्येत एकदम खालावल्यामुळे त्याला उपचारासाठी सोलापूर येथे हलविण्यात आले आहे.

या उपोषणाच्या समर्थनार्थ सोमवारी सायंकाळी मशाल मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातल्या मुख्य मार्गावरून हा मोर्चा पुन्हा उपोषण स्थळी आला. तिथे उबाठा शिवसेनेचे माजी जिल्हा प्रमुखदी पक गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. आज उपोषणाचा चौथा दिवस आहे. या ठिकाणी सोमवारी सायंकाळी प्रशासनाच्या वतीने प्रांताधिकारी सचिन इथापे, अप्पर जिल्हा पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर,पोलीस उपाधीक्षक संकेत देवळेकर, तहसीलदार सचिन मुळीक मोहोळचे पोलीस निरीक्षक सुरेश कुमार राऊत यांनी भेट देऊन उपोषण स्थगित करण्याची विनंती केली. यावेळी उपस्थितांनी आमची बैठक वरिष्ठांबरोबर लावून देण्याची मागणी केली. मंगळवारी मोहोळ शहर बंद ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# जनतेने शिवसेनेच्या पाठीशी उभे रहावे

### ● अमर पाटील यांचे आवाहन ● दक्षिण विधानसभेत गावभेट दौरा सुरू

**दक्षिण सोलापूर/प्रतिनिधी**

गेल्या दहा वर्षात सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघाचा भाजपने विकास केला नाही. आज तालुका जिल्ह्यात पिछाडीवर पडला आहे. या तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी दक्षिण मध्ये शिवसेनेचा आमदार निवडून येणे गरजेचे आहे यासाठी आगामी विधानसभा निवडणुकीत जनतेने शिवसेनेच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावेत असे आवाहन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमर पाटील यांनी केली आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे सोलापूरचे संपर्क प्रमुख अनिल कोकिळ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाप्रमुख अमर पाटील यांनी दक्षिण विधानसभा दौरा सुरू केला असून गावभेटी दरम्यान पाटील बोलत होते. पाटील यांनी हत्तूर, सिंदखेड, होनमुर्गी, औराद संजवाड, राजुर, बोळकवटे, हत्तरसंग, कुडल, बरूर, चिंचपूर या गावात तसेच सोलापुरातील हद्दवाढच्या अनेक प्रभागात याठिकाणी भगवा सप्ताह कार्यक्रम आयोजित केले होते. यावेळी प्रत्येक गावामध्ये शिवसेना सदस्य नोंदणी अभियान, घर तेथे शिवसैनिक व गाव तिथे शिवसेनेची शाखा स्थापन करणे, नवीन मतदारांची नोंदणी करणे, बुथ प्रमुख, गट प्रमुख व बी. एल. ए. यांच्या नेमणुका करणे या आदी कामांचा शुभारंभ पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख प्रिया बसवंती, विधानसभा प्रमुख भीमाशंकर म्हेत्रे, उपजिल्हाप्रमुख धर्मराज बगले,संतोष पाटील, महेश पाटील , तालुका प्रमुख योगीराज पाटील,लता राठोड, लता दास, रवी कांबळे, शरणराज केंगनाळकर, राजू बिराजदार, राहुल गंधुरे,बालाजी चौगुले, मीनल ताई दास, लता दास, राजू कोळी, सुरेश शेंडगे,संगण्णा हत्तरसंग,आमसिद्ध बगले,सोमनाथ बगले,राम चौगुले, अनिल पाटील,राम वाकसे,किरण बिदरकोटी, सुनील शिंदे, संजू वाकसे,अनिल वाले,संतोष बंदपट्टे ,अली पिरजादे, पंचप्पा कुमठे,सचिन गंधुरे,सचिन माने,अण्णा खांडेकर,बबलू खरात, अनिरुद्ध दहिवडे, मयुरेश धानगोंडे आदी उपस्थित होते.



दक्षिण सोलापूर : दक्षिण विधानसभेत गावभेट दौऱ्यात शिवसेना सदस्य नोंदणीचा फॉर्म भरून घेताना अमर पाटील दिसत आहेत.

### मतदारसंघाचा कायापालट करणार

आमदार म्हणून निवडून आल्यावर दक्षिण मतदारसंघाचा कायापालट करू असे सांगत अमर पाटील यांनी वडापूर येथे धरणाची उभारणी करु, सीना-भीमा नदीवरील बंधाऱ्यांची उंची वाढवू, तालुक्यातील कालवे, तलाव दुरुस्ती करून तिथे उजनी धरणाचे पाणी आणण्यासाठी प्रयत्न करू, मंद्रूपला तालुका घोषित करून तिथे नवीन एमआयडीसी, उपबाजार समिती, नवीन मेडिकल, इंजिनिअरिंग आणि आयुर्वेदिक कॉलेज उभारण्यासाठी प्रयत्न करू, सोलापुरातील प्रभागामध्ये मजबूत रस्ते बनवू, आरोग्य सुविधा उपलब्ध करून देऊ, शासकीय सिव्हिल हॉस्पिटल, नवीन प्रशस्त बसस्थानक, नवीन सांस्कृतिक भवन उभारण्यासाठी प्रयत्न करणार आहोत, असे सांगितले.



सोलापूर : आ. देशमुख यांना निवेदन देताना शितल गायकवाड व इतर.

## सोरेगाव येथील सर्व समस्या तत्काळ सोडवू : आ. देशमुख

**सोलापूर/प्रतिनिधी**

विजापूर रोडवरील सोरेगाव येथील सर्व समस्या तत्काळ सोडवू, असे आश्वासन आमदार सुभाष देशमुख यांनी दिले. शितल गायकवाड यांनी मजरेवाडी रस्ता स्ट्रिटलाईट ड्रेनिज, नळाची कामे करण्याची मागणी आमदार देशमुख यांव्याकडे केली होती.

आंबेडकर नगर येथील जुन्या सभामंडपाचे दुरुस्तीकरण करून देण्याचेही सूचवले होते. तेही काम पूर्ण करण्याचे आश्वासन आमदार देशमुख यांनी दिले. यावेळी शितल गायकवाड यांच्यासोबत आंबेडकर नगर येथील नागरिक उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### श्रावणमासानिमित्त स्वयंम शिक्षा फाऊंडेशनतर्फे महाप्रसाद वाटप

**दक्षिण सोलापूर** : पवित्र श्रावण मासानिमित्त स्वयंम् शिक्षा फाऊंडेशनच्यावतीने दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप येथे मळसिद्ध मंदिरात सोमनाथ वैद्य यांच्या हस्ते भक्तांना प्रसाद वाटप करण्यात आला तसेच महिलांना पर्स वाटप करण्यात आला.

यावेळी यात्रा कमिटी अध्यक्ष राजेश देशमुख, हर्षवर्धन देशमुख, सोमनाथ वैद्य भावी आमदार, तमन्ना पुजारी, सुरेश टेळे ग्रामपंचायत सदस्य, मळसिद्ध घेनसिद्ध पुजारी, धनंजय पुजारी महाराज, केंदुळी पुजारी, महादूलिंग सोमनिंग पुजारी, गंगाधर नरोटे, शिवानंद लोभे, सुरेश देशमुख, सुरेश पाटील, बाळासाहेब देशमुख, सुभाष पुजारी, सुभाष वाघमोडे व ग्रामस्थ उपस्थित होते. श्रावण मासानिमित्त मळसिद्ध मंदिरात अमोगसिद्ध महाराज यांचे संपूर्ण चरित्र सांगण्यात येत आहे. सर्व भक्तांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन हर्षवर्धन देशमुख यांनी भक्तांना केले. यावेळी स्वंयम् शिक्षा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ वैद्य यांनी दक्षिण सोलापूर तालुक्याच्या विकासासाठी मी कटिबद्ध आहे आणि तसेच मी हे एक सामाजिक कार्य म्हणून हा उपक्रम राबवत आहे. श्रावण मासानिमित्त उपवास करणाऱ्या सगळ्या भक्तगणांना शुभेच्छा दिल्या.



### धार्मिक रत्न पुरस्काराने गहिनीनाथ महाराज औसेकर सन्मानित

**पंढरपूर** : शिरोरे प्रतिष्ठान कामखेडा नाशिक यांच्यावतीने श्रीनाथ संस्थानचे सद्गुरु तथा श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे देवस्थान समिती पंढरपूरचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांना त्यांच्या धर्मकार्य आणि नाथ संस्थानच्या उल्लेखनीय सेवेबद्दल धार्मिक रत्न हा पुरस्कार देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले आहे. शिरोरे प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश शिरोरे, सचिव रमेश शिरोरे, दत्तात्रय शिरोरे, वासुदेव मुसळे, जितेंद्र वेढणे, दिलीप सोनवणे, निलेश मुसळे या प्रतिष्ठानच्या मान्यवर पदाधिकारी यांच्या उपस्थितीत श्रीक्षेत्र पंढरीत हा धार्मिक रत्न पुरस्कार औसेकर महाराजांना देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. गहिनीनाथ महाराज औसेकर यांचे वारकरी संप्रदायातील योगदान नाथ संस्थानच्या गुरुपरंपरेतील आणि श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर देवस्थान समितीतील विशेष उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना पुरस्कार व सन्मान असून औसेकर महाराज म्हणजे, संप्रदायातील एक ऊर्जा व दिशा मार्गदर्शक देणारे व्यक्तित्व असे गौरवोद्गार शिरोळे प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश शिरोळे यांनी पुरस्कार प्रदानप्रसंगी सांगितले. आषाढी वारीच्या पर्वात हा पुरस्कार महाराजांना मिळाल्याबद्दल समस्त वारकरी व शिष्य समुदायात आनंद व्यक्त होत आहे.

### पंढरपूर सिंहगडला सोलापूर विद्यापीठाचे तीन पुरस्कार

**पंढरपूर** : अल्पावधीतच पंढरपूर सिंहगड इन्स्टिट्यूटने शैक्षणिक क्षेत्रात दबदबा निर्माण करून नावलौकिक संपादित केला आहे.



सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंहगड इन्स्टिट्यूट पंढरपूरमध्ये एस.के.एन सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग महाविद्यालय असून या महाविद्यालयाला उत्कृष्ट प्राचार्य, उत्कृष्ट महाविद्यालय अन् उत्कृष्ट शैक्षणिक संस्था असे पुरस्कार देऊन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून गौरविण्यात आले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या १४ व्या वर्धापनदिनानिमित्त सन २०१७-२०१८ मध्ये पंढरपूर सिंहगड इंजि. कॉलेजमध्ये कार्यरत असलेले प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांना गौरविण्यात आले. सन २०२२-२३ यावर्षी पंढरपूर सिंहगड इंजिनिअरींग महाविद्यालयाला उत्कृष्ट महाविद्यालय आणि सन २०२३-२४ यावर्षी सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेला उत्कृष्ट शैक्षणिक संस्था म्हणून गौरविण्यात आले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी पंढरपूर सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. अनेक क्षेत्रातील करिअरच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. विविध संधीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे कौशल्य व गुणात्मक दर्जा वाढतो, त्यामुळे विद्यार्थ्यांना जगातील नामांकित कंपनीत नोकरी मिळविण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान प्राप्त होते. त्यामधून अनेक विद्यार्थी नामांकित कंपनीत निवडलेले जात आहेत. अल्पावधीतच पंढरपूर सिंहगड इंजिनिअरींग कॉलेजने उत्कृष्ट निकाल व उत्कृष्ट प्लेसमेंट देऊन गुणवत्ता सिद्ध केली आहे. विद्यार्थ्यांना पंढरपूर सिंहगड इंजिनिअरींग कॉलेजमधून नामांकित कंपनीत नोकऱ्या भेटत असल्याने विद्यार्थी व पालक वर्गातून आनंद व समाधान व्यक्त होत आहे.

### बापूराव करडे यांचे निधन



**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील ग्रामपंचायतीचे माजी सदस्य बापूराव खंडू करडे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६३ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई असा परिवार आहे.

### विनायक कुलकर्णी यांचे निधन



**सोलापूर** : विनायक कुलकर्णी यांचे मंगळवार दि. ६ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७४ वर्षांचे होते. त्यांच्यावर मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, जावई असा परिवार आहे. ते जिल्हा परिषदेमध्ये स्टेनोग्राफर म्हणून कार्यरत होते.

# शहाजीबापूंच्या संकल्पनेतून तरुणांच्या आई-वडिलांचे स्वप्न साकार : चौगुले

- नोकरी महोत्सवात ७८५ बेरोजगार तरुणांनी नोंदणी
- मुलाखतीनंतर ३४५ तरुणांना ऑन दि स्पॉट नोकरीचे पत्र
- तरुणांना १५ हजारांपासून ४० हजारांपर्यंत प्रती महिना वेतन मिळणार

**सांगोला/प्रतिनिधी**

**बेरोजगार तरुणांना नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यासाठी नोकरी महोत्सवाचे आयोजन करून शेकडो कुटुंबांचे संसार उभे करण्याचा प्रयत्न आमदार शहाजीबापूंनी केला आहे. यामुळे आमदार शहाजीबापूंच्या संकल्पनेतून शेकडो तरुणांच्या आई वडिलांचे स्वप्न साकार होणार आहे. ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगारांना नोकरी मिळवण्यासाठी अपार कष्ट घ्यावे लागत आहेत. मतदारसंघातील आ. शहाजीबापूंचे काम पाहून समाधान वाटले आहे. भविष्यकाळात एकही सुशिक्षित पदवीधर बेरोजगार राहणार नाही यासाठी बेरोजगारांना तालुक्यातच नोकरी उपलब्ध होण्यासाठी एमआयडीसी आणण्यासाठी प्रयत्न करावा. विकास कामांच्या जोरावर शहाजीबापू तुमचा विजय पक्का आहे, असा विश्वास नवी मुंबईचे जिल्हाप्रमुख तथा सांगोला विधानसभा निवडणूक प्रभारी विजय चौगुले यांनी व्यक्त केला.**

राजर्षी शाहू महाराज क्रीडा व शिक्षण प्रसारक मंडळ, चिकमहुद यांच्यावतीने तसेच आमदार शहाजीबापू पाटील यांच्या संकल्पनेतून सांगोल्यात रविवार ११ ऑगस्ट रोजी इयत्ता पाचवी ते पदवी पर्यंतचे शिक्षण झालेल्या बेरोजगार तरुणांसाठी भव्य नोकरी महोत्सव झाला.

या नोकरी महोत्सवात ७८५ बेरोजगार तरुणांनी नोदणी केली होती. मुलाखती नंतर ३४५ तरुणांना ऑन दि स्पॉट नोकरीचे पत्र देण्यात आले. त्यांना १५ हजारांपासून ४० हजारांपर्यंत प्रती महिना वेतन मिळणार आहे.



सांगोला : बेरोजगार तरुणांना नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यासाठी नोकरी महोत्सवात तरुणांना ऑन दि स्पॉट नोकरीचे पत्र देताना आमदार शहाजी पाटील आणि आदी मान्यवर.

यावेळी आमदार शहाजीबापू पाटील म्हणाले, हिम्मत दाखवली तर तालुक्याचा दुष्काळ हटवून सुजलाम सुफलाम तालुका होऊ शकतो हे पाच वर्षात सिद्ध करून दाखविले आहे.

सर्वच सिंचन प्रकल्पाचे पाणी सांगोल्याला मिळत असल्याने तालुक्यातील एकही गाव पाण्यापासून वंचित राहिले नाही. पाच वर्षात रस्ते, पाण्याचा प्रश्न मार्गी लावला आहे. राजकारण करीत असताना समाजसेवेचा हेतू प्रामाणिक स्वच्छ असल्याने शासनाचा पैसा विकास कामासाठी तळागाळापर्यंत पोहोचला आहे, असे आमदार शहाजीबापू पाटील यांनी सांगितले.

प्रास्ताविक तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे यांनी केले. यावेळी माजी नगराध्यक्ष रफिक नदाफ, युवा नेते दिग्विजय पाटील, धनंजय काळे, दादासाहेब लवटे, सागर पाटील, दीपक ऊर्फ गुंडादादा खटकाळे, प्रीतीश दिघे, प्रा. संजय देशमुख, समीर पाटील, आनंदा माने, शिवाजी घेरडे, मुबिना मुलाणी, राणी माने, छाया मेटकरी, अप्सरा ठोकळे, अस्मिर तांबोळी, ज्ञानेश्वर तेली, अभिजीत नलवडे, सुभाष इगोले, दादासाहेब वाघमोडे, अजिंक्य शिंदे, सोमेश यावलकर, शिवाजीराव बाबर, जगदीश पाटील, धनजंय बागल, सत्यवान मोरे, विजय इंगोले, दीपक ऐवळे, यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.


# विधानसभा निवडणुकीत पुन्हा आ. सातपुतेंना उतरवणार की उमेदवार बदलणार याविषयी संभ्रम

**पिलीव/प्रतिनिधी**

महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूक अवघ्या दोन महिन्यावर येऊन ठेपली आहे. सर्वच पक्षातील इच्छुकांची सध्या आमदार होण्यासाठी मोठी धडपड सुरू असल्याचे पहावयास मिळत आहेत. यामुळे इच्छुक उमेदवार सध्या लग्न समारंभ असो की कोणतेही छोटे मोठे कार्यक्रम किंवा इतर धार्मिक कार्यक्रमांना उपस्थित राहत आहेत.

महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीनंतर अनेक मतदारसंघात चित्रच बदलले आहे. यामध्ये माळशिरस विधानसभा मतदारसंघाचा विचार केला तर मोहिते-पाटील व त्यांचे कट्टर पारंपरिक विरोधक उत्तम जानकर हे एकत्र आले आहेत. याठिकाणी लोकसभा मोहिते-पाटील यांना तर विधानसभा उत्तम जानकर यांना असे सूत्र ठरल्याचे बोलले जात आहे. लोकसभा निवडणुकित धैर्यशील मोहिते-पाटील खासदार झाले तर भाजपचे उमेदवार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांचा पराभव झाला.

याठिकाणी सर्व आमदार भाजप समर्थक पक्षाचे असताना भाजपच्या उमेदवाराचा पराभव झाला. यामध्ये सध्या विधानसभा निवडणूक अवघे दोन महिन्यावर आली आहे मात्र, माळशिरस तालुक्याचे लोकप्रिय आ. राम सातपुते हे सध्या अधिवेशन संपल्यापासून मतदारसंघात नाहीत. यामुळे सध्या माळशिरस मतदारसंघात भाजप विद्यमान आ. राम सातपुते यांना पुन्हा निवडणुकीत उतरवणार का उमेदवार बदलणार अशी जोरदार चर्चा सध्या मतदारसंघात रंगली आहे. माळशिरस तालुक्यात आजपर्यंत कोणत्याही आमदाराने विकासकामांना निधी आणला नाही एवढा प्रचंड मोठा निधी विशेषतः वंचित गावासाठी आणला विकासकामे असतील आरोग्य क्षेत्रात असो वा इतर कोणत्याही अडी अडचणी असो आ. राम सातपुते यांनी गेल्या साडेचार पाच वर्षात



तालुक्यात जी विकासकामे केली त्याला तोडच नाही कामासाठी आलेला माणूस कोणत्या पक्षाचा आहे, कोणत्या जाती धर्माचा आहे कधीही त्यांनी विचारले नाही. तर काम करण्यासाठी कधीही त्यांनी मध्यस्थ याचाही विचार केला नाही. यामुळे तालुक्यात सर्वसामान्य माणूस सुद्धा आ. राम सातपुते हा कामाचा माणूस आहे असे म्हणतात. माळशिरस तालुक्याचे नेतृत्व करीत असताना पक्षाने त्यांना सोलापूर लोकसभा निवडणुकित त्यांना उतरविले खरे तर त्यांची इच्छा नसताना पक्षाचा आदेश मानून त्यांनी जय पराजय याचा विचार न करता केवळ पक्षादेश न डावलता ते निवडणुकीत उतरले त्याठिकाणी त्यांचा पराभव झाला. ते पुन्हा माळशिरस तालुक्यातील जनतेची सेवा करणयासाठी सज्ज झाले पावसाळी अधिवेशनात त्यांनी तालुक्यातील विकासकामांना प्रचंड मोठा निधी मंजूर केला पण ते अधिवेशन झाल्यापासून मतदारसंघात फारसे दिसलेच नाहीत. यामुळे त्यांच्या समर्थकांमध्ये मोठी नाराजी पसरली असून येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत भाजपा आ. राम सातपुते यांनाच उमेदवारी देणार की उमेदवार बदलणार याविषयी सध्या मतदारसंघात जोरदार चर्चा रंगली आहे. तालुक्यातील राजकीय समीकरणे कितीही बदलू द्या पण आ. राम. सातपुते यांनी तालुक्यात जी विकासाची गंगा आणली ते आजपर्यंत कोणालाही शक्य झाले नाही यामुळे राम सातपुते यांना जनतेच्या विश्वासावर व केलेल्या विकासकामांमुळे निवडणूक अवघड जाईल, असे वाटत नाही.

### हॉलिबॉल स्पर्धेत माने विद्यालयातील मुलींचा संघ विजयी

**उत्तर सोलापूर** : तालुकास्तरीय हॉलीबॉल स्पर्धेत दिलीपराव माने विद्यालयाचा १७ वर्षे वयोगट मुलींचा संघ विजयी झाला आहे. मुलींच्या संघात कर्णधार-नम्रता जाधव दीक्षा कासे, सबिया शेख, हिंदवी साबळे, प्रतिक्षा कांबळे, अमृता जाधव यांची जिल्हा स्तरीय हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड झाली. क्रीडा शिक्षक अश्फाक अत्तार, धर्मदेव शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. यशस्वी खेळाडूंचे मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष संभाजी भडकुंबे, पंचायत समिती उतरचे माजी सभापती रजनी भडकुंबे हगलूरचे उपसरपंच प्रगती भडकुंबे-मुख्याध्यापक-राजेंद्र मोहोळकर, उमेश जगताप, शशिकांत गायकवाड यांच्यसह शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# नागपंचमीचा सण पारंपारिक पद्धतीने विविध उपक्रमाने साजरा करून मानकरी यांच्या गौराईच्या विसर्जनाने सांगता करण्यात आली

**पिलीव/प्रतिनिधी**

माळशिरस तालुक्यातील पिलीव परिसरात सालाबादप्रमाणे याहीवर्षी श्रावण महिन्यात येणाऱ्या नागपंचमीचा सण पारंपारिक पद्धतीने भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला

नागपंचमीची सुरुवात रुढी परंपरेप्रमाणे नागाला भाऊ मानून महिलांनी उपवास ठेवून नागपंचमीच्या सणास प्रारंभ करण्यात आला तर दुसऱ्या दिवशी पंचमीनिमित्त महिलांनी झोका खेळणे फेर धरून गाणी म्हणणे आदी पारंपरिक खेळ साजरे केले तर तरुणांनी पतंग, वावड्या उडवून आनंद साजरा केला तसेच यावेळी नाभिक समाजाने आपली सर्व सलूनची दुकाने बंद ठेवून नागोबाचे पूजन करून भक्तांच्या हातात पिवळा धागा बांधून नागदंशापासून



पिलिव : मदने-पाटील परिवाराच्या गौराईसमोर पंचमीची गाणी फुगड्या लंगडी फेर धरलेल्या सुवासिनी महिला व मुली.

विषबाधा होऊ नये म्हणून बंधन बांधले. त्याचप्रमाणे मदने-पाटील परिवार, देशमुख परिवार व श्रीराम गल्लीच्यावतीने मानाच्या गौराईची स्थापना करून विधी व पूजा करून वाजत गाजत पंचमीची गाणी म्हणत विसर्जन करण्यात आले. पारंपरिक पद्धतीने यावेळी मानाच्या मदने पाटील यांच्या गौराईचे पूजन मानकरी करणसिंह पाटील व रोहिणी करणसिंह पाटील, कमल बाबूराव पाटील, नामदेव पाटील तसेच इंदूबाई पाटील व रेश्मा नवनाथ पाटील, सुभद्रा पाटील, रुक्मिणी मेटकरी, विठ्ठल मेटकरी, बबनराव पाटील, अमोल मदने-पाटील यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.

यावेळी हनुमान तालीम येथे आयोजित गौराई समारंभात महिलांनी फेर धरून पंचमीची गाणी फुगड्या लंगडी उखाणे व विविध महिलांचे खेळ सादर करून त्यानंतर वाजत गाजत मानाच्या मदने-पाटील गौराईचे पूजन करून मिरवणुकीने पूजन करून विसर्जन करण्यात आले.

यावेळी सं. कमल बाबूराव पाटील, रोहिणी करणसिंह पाटील, सुभद्रा पाटील, रुक्मिणी मेटकरी, इंदुबाई पाटील, रेश्मा पाटील निशा पाटील, सरस्वती जाधव, शांताबाई पाटील, संजीवनी कस्तुरे, लक्ष्मीदेवी कोळी, शोभा देवकर, स्मिता देवकर, पल्लवी देवकर, सुनीता करडे, सुरेखा काळे तसेच मानकरी देशमुख परिवारातर्फे गौराईचे पूजनाचे मानकरी महादेव देशमुख यांच्या हस्ते करून वाजत गाजत मिरवणुकीने गौराईचे विसर्जन करण्यात आले. यावेळी महादेव देशमुख, संतोष देशमुख, निखिल देशमुख, सोमनाथ देशमुख व देशमुख परिवारातील सुवासिनी महिला मिरवणुकीत सहभागी झाल्या होत्या. त्याचप्रमाणे श्रीराम गल्लीतही गौराईची स्थापना करून विधीवत पूजन करून वाजत-गाजत विसर्जन करण्यात आले.

# नद्यांवर बंधारे बांधून शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती घडवून आणू : वैद्य

**श्रावण सोमवारनिमित्त महाप्रसादाचे वाटप**

**दक्षिण सोलापूर/प्रतिनिधी**

'दक्षिण सोलापूर तालुक्यातील सीना भीमा दोन्ही नद्यांवर आवश्यक त्या ठिकाणी बंधारे बांधून शेतकऱ्यांच्या शेतीला २४ तास पाणीपुरवठा होण्यासाठी प्रयत्नशील राहू. यासाठी सरकारकडे पाठपुरावा करण्यासाठी मला साथ द्या, येणाऱ्या काळात शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती घडवल्याशिवाय शांत बसणार नाही', असे प्रतिपादन स्वयंम शिक्षा फाउंडेशनचे अध्यक्ष सोमनाथ (सोमेश) वैद्य यांनी केले.

औराद येथे श्रावण महिन्यातील दुसऱ्या श्रावण सोमवारी सालापदाप्रमाणे यंदाही (हेडगी) यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी अध्यक्ष वैद्य यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.



औराद : महाप्रसादाचे वाटप करताना सोमनाथ (सोमेश) वैद्य, माजी मुख्याध्यापक संगणणा पाटील, बाबूराव पाटील, लिंगराज पाटील, श्रीमंत पाटील, शाम तेली, सिद्धाराम गुरव, सुरेश शेंडगे, संजय वाघमारे यांच्यासह ग्रामस्थ.

याप्रसंगी औराद ग्रामस्थांकडून औराद विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन बाबूराव पाटील यांच्या हस्ते नागरी सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविकात माजी मुख्याध्यापक संगण्णा पाटील ग्रामस्थांच्यावतीने त्यांचे स्वागत करून महाप्रसादाची व्यवस्था केल्याबद्दल त्यांचे पहिल्यांदा स्वागत करून दक्षिण सोलापूर तालुक्यात अल्पावधींतच गरुडझेप घेतलेल्या सोमनाथ वैद्य यांच्या कामाचे कौतुक केले. सर्व दानामध्ये अन्नदान हे श्रेष्ठ असून ते महत्त्वाचे काम सोमनाथ वैद्य करत असल्याबद्दल आनंद व्यक्त करून त्यांच्या कार्याची गौरव केले.

**सुवासिनींची लक्षणीय उपस्थिती...**

ग्रामदैवत मल्लिकार्जुन श्रावण सोमवार (हेडगी) यात्रेनिमित्त महिला भगिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सर्व महिला भगिनींच्या डोक्यावर आकर्षकरित्या दासोह घेऊन यात्रेत सहभागी झाल्या होत्या. सीना नदीतील पाण्याचे गंगापूजन सुहासिनींच्या हस्ते करण्यात आले.

**पालख्यांच्या सहवासामुळे भारावून गेलो**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील औराद येथे दुसऱ्या श्रावण सोमवार (हेडगी) यात्रानिमित्त ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन, श्री सिद्धनाथ, श्री बिसलसिद्ध, श्री मलकारसिद्ध या देवतांच्या पालखी मिरवणुकित सहभागी होता आले. स्वतःला त्याचा मन भरून आणून घेता आला. यापेक्षा आनंद मला कुठेही मिळाला नाही, असे सत्कर्म माझ्या हातून घडो, अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. महत्वाचे म्हणजे या पालख्यांच्या सहवासामुळे भारावून गेलो.

**- सोमनाथ (सोमेश) वैद्य,**
अध्यक्ष, स्वयंम् शिक्षा एज्यु. फाउंडेशन

सुराज्य सोलापूर



## संक्षिप्त वृत्त



### डॉ. पिंपळे यांची कोल्हापूर जिल्हा आरोग्य अधिकारीपदी नियुक्तीबद्दल सन्मान

**वेळापूर** : वेळापूर गरुड बंगला येथे, वेळापूर गावचे सुपुत्र डॉ. अनिरुद्ध पिंपळे यांची कोल्हापूर जिल्हा आरोग्य अधिकारीपदी नियुक्ती झाल्याबद्दल, त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा माळशिरस पंचायत समितीचे माजी उपसभापती उत्तमराव जानकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी मार्केट कमिटीचे माजी संचाल दादासाहेब घाटगे, आरटीओ एजंट संघटना प्रदेश उपाध्यक्ष संजय देशपांडे, उद्योजक राजू शिंदे, नजीर शेख, डॉ. देवकते, सामाजिक कार्यकर्ते अमोल पनासे उपस्थित होते.



### सुरेश हसापुरेंचा न्यू जॉगर्स फाऊंडेशनला विकास निधी सूपूर्द

**दक्षिण सोलापूर** : काँग्रेसचे सोलापूर जिल्हा कार्याध्यक्ष व दक्षिण सोलापूरचे नेते सुरेश हसापुरे यांनी नेहरुनगर शासकीय मैदान येथे भेट दिली. यावेळी न्यु जॉगर्स फाऊंडेशनचे अध्यक्ष सुहास साळुंके व उपाध्यक्ष हेमंत जाधव यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. शहरातील विजापूर रोड परिसरातील अनेक खेळाडू, तरुण, महिला, मुले, ज्येष्ठ नागरिकांना नेहरुनगरचे शासकीय मैदान हे खेळांच्या सरावासाठी व व्यायामासाठी अत्यंत उपयोगी आहे. याठिकाणी दररोज सकाळी व संध्याकाळी खेळाडू व नागरिकांची व्यायामासाठी मोठ्या संख्येने उपस्थित असते. हसापुरे यांनी मैदानातील उपलब्ध विविध सोयी सुविधांविषयी माहिती जाणून घेतली. यावेळी न्यु जॉगर्स फाऊंडेशनचे अध्यक्ष सुहास साळुंके, कार्याध्यक्ष उन्मेश कमलापुरे, उपाध्यक्ष हेमंत जाधव, कोषाध्यक्ष दिलीप कदम व इतर सभासदांनी मैदानात नुकतेच वृक्षारोपण करण्यात आल्याची माहिती दिली. तसेच मैदानावर आणखी काय सुधारणा सोयी सुविधा हव्या आहेत याविषयीही माहिती दिली. प्रणिती शिंदे यांच्या सूचनेनुसार हसापुरे यांनी तात्काळ नेहरुनगर शासकीय मैदानावर खेळाडू व नागरिकांसाठी विविध सोयीसुविधा करण्यासाठी ५० हजाराचा विकास निधी न्यु जॉगर्स फाऊंडेशनचे अध्यक्ष सुहास साळुंखे यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी फाऊंडेशनचे सहसचिव विजय झाकणे, माजी अध्यक्ष संतोष कदम, दीपक नलावडे, सभासद विरेश नसले, काशीनाथ औरसंग, आनंद कटप, मनोज जाकेटिया, पंकज वाघमोडे, सतीश घोडके, शशी कोळेकर, हत्ताळे, सुतार उपस्थित होते.

### पाणी मागणी अर्ज भरण्याचे शेतकऱ्यांना आव्हान

**वेळापूर** : कार्यकारी अभियंता निरा उजवा कालवा विभाग फलटण यांनी खरीप हंगाम २०२४-२५ साठी फळबाग, ऊस, भुसार पिकांना पाणी मागणीबाबत जाहीर प्रगटन केलेले असून पाणी मागणीसाठी दि. ५ आगस्टपर्यंत मुदत होती, त्यानंतर १० ऑगस्टपर्यंत मुदत वाढवण्यात आली होती, परंतु पाणी मागणी अर्ज अत्यंत कमी आले असल्याने पाणी मागणी अर्ज स्वीकारण्यात येत आहेत तरी निरा उजवा कालवा लाभ क्षेत्रातील सर्व लाभधारक शेतकऱ्यांनी व वेळापूर शाखा अंतर्गत सर्व लाभधारक शेतकऱ्यांनी पाणी मागणी अर्ज देऊन जास्तीत जास्त पाणी मागणी करावी, असे आवाहन सावता परिषद प्रदेश उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य व वेळापूर सोसायटीचे व्हा. चेअरमन महादेव ताटे यांनी केले आहे.



### कामगारांना गृहोपयोगी साहित्य

**माढा** : प्रहार शेतकरी संघटनेच्यावतीने उंदरगाव तालुका माढा येथे बांधकाम कामगारांना गृहोपयोगी संचाचे टोकन वाटप शिबिरामध्ये ४४५ कामगारांना गृह उपयोगी संचाचे वाटप करण्यात आले. सोलापुरात कामगारांना जाऊन प्रचंड गर्दीच्या कारणाने गृहोपयोगी संच घेणे शक्य नसल्याने प्रहार शेतकरी संघटनेच्यावतीने माढा तालुक्यातील ४४५ लाभार्थ्यांना टोकणचे वाटप करण्यात आले. त्या शिबिरामधील लाभार्थ्यांना येणाऱ्या पुढील आठवड्यात उंदरगावात प्रत्यक्ष गृहोपयोगी संचाचे वाटप करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रहार शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष अमोल केसरे आणि तालुका उपाध्यक्ष भास्कर कदम यांच्या हस्ते करण्यात आले तर प्रमुख उपस्थिती म्हणून अमोल तांबीले होते. शिबिरात महिलांचा विशेष सहभाग दिसून आला. सदर शिबीर हे प्रहार शेतकरी संघटनेचे जिल्हा समन्वयक पंडित साळुंके यांच्या प्रयत्नातून आयोजित करण्यात आले होते. सदर शिबीर पार पाडण्यासाठी संतोष कोळी, रविकांत कोळेकर, युवराज तांबीले, आबासाहेब कोळेकर, विष्णू सुतार, महेश आरे, यश चव्हाण, संतोष माने, नितीन रंगा चव्हाण, किरण लवटे, सागर चव्हाण, प्रशांत चव्हाण, धीरज भांगे, पोपट घुले, विशाल मुजमुले, जयंत मोटे आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

### पाणी मागणी अर्ज भरण्याचे शेतकऱ्यांना आव्हान

**वेळापूर** : कार्यकारी अभियंता निरा उजवा कालवा विभाग फलटण यांनी खरीप हंगाम २०२४-२५ साठी फळबाग, ऊस, भुसार पिकांना पाणी मागणीबाबत जाहीर प्रगटन केलेले असून पाणी मागणीसाठी दि. ५ आगस्टपर्यंत मुदत होती, त्यानंतर १० ऑगस्टपर्यंत मुदत वाढवण्यात आली होती, परंतु पाणी मागणी अर्ज अत्यंत कमी आले असल्याने पाणी मागणी अर्ज स्वीकारण्यात येत आहे. जास्त पाणी मागणी करावी, असे आवाहन सावता परिषद प्रदेश उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य व वेळापूर सोसायटीचे व्हा. चेअरमन महादेव ताटे यांनी केले आहे.

# कुकडी कालव्यातून करमाळा तालुक्यातील तलावांमध्ये पाणी सोडण्याच्या सूचना

**करमाळा/प्रतिनिधी**

**कुकडी ओव्हर फ्लोचे पाणी करमाळा तालुक्यातील विविध तलावांमध्ये सोडण्याची मागणी जिल्हा नियोजन समिती सदस्य दिग्विजय बागल यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे केली होती. दि. ७ ऑगस्ट रोजी बागल यांनी दिलेल्या या निवेदनाची दखल घेऊन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी कुकडी पाटबंधारे मंडळ, पुणेचे अधीक्षक अभियंता यांना पत्र पाठवून याबाबत तातडीने कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत.**

७ ऑगस्ट रोजी पाठवलेल्या निवेदनात बागल यांनी म्हटले होते की, 'यंदा कुकडी धरण क्षेत्रात समाधानकारक पाऊस झाल्याने कुकडी वरील येडगाव (७८.६७), डिंभे (९१.९७%), माणिकडोह (४५.८३%), चासकमान (९६.६४%), पिंपळगाव जोगे (१७.६९%) ही धरणे भरत आली असून सध्या त्यामधून ओव्हर फ्लोचे पाणी सोडण्यात येत आहे.

मात्र, करमाळा तालुक्यात अद्याप समाधानकारक पाऊस झाला नसल्याने



दिग्विजय बागल

तालुक्यातील पाझर तलावांमध्ये अत्यंत कमी पाणीसाठा आहे. त्यामुळे कुकडी ओव्हर फ्लोचे पाणी करमाळा तालुक्यातील मांगी तलावासह वीट, कुंभारगाव, पिंपळवाडी, पोंधवडी, कोर्टीसह इतर तलावांमध्ये सोडण्यात यावे.

सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पाणीटंचाई शाखेने बागल यांच्या पत्राची दखल घेऊन दि. १० ऑगस्ट रोजी कुकडी पाटबंधारे मंडळ, पुणेचे अधीक्षक अभियंता यांना ई-मेल करून कुकडी कॉम्प्लेक्समधील भरलेल्या धरणांतून सोडण्यात येणारे पुराचे पाणी करमाळा तालुक्यातील मांगी, वीट, कुंभारगाव, पिंपळवाडी, पोंधवडी, कोर्टी या व इतर तलावामध्ये पाणी सोडण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

राज्यात अनेक ठिकाणी समाधानकारक पाऊस पडला असला तरी करमाळा तालुक्यातील अनेक भागात समाधानकारक पाऊस झालेला नाही.

मध्यंतरीच्या ढगाळ वातावरणानंतर सध्या ऊन पडत असल्याने तसेच जून महिन्यात पेरणी झालेली पिके आता पाण्याच्या प्रतिक्षेत आहेत. ही परिस्थिती लक्षात घेऊन दिग्विजय बागल यांनी कुकडी ओव्हर फ्लोचे पाणी सोडण्याची मागणी केली होती. लवकरच हे पाणी सोडण्यात येणार असल्याने तालुक्यातील ग्रामीण भागात आनंदाचे वातावरण आहे.

# दिपकआबांचा गावभेट अन् जनसंवाद ग्रामीण दौरा

**सांगोला/प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार दिपकआबा साळुंखे-पाटील यांचा गावभेट व जनसंवाद दौरा ग्रामीण भागात सुरू असून नराळे व सोनंद ता. सांगोला गावातही दिपकआबांच्या दौऱ्याला अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. हजारो नागरिकांची प्रचंड गर्दी, शेकडो प्रश्नांचा जागेवरच निपटारा होत असल्याने सर्वसामान्य नागरिकांच्या चेहऱ्यावर उत्साह ओसंडून वाहू लागला आहे. रविवार दि ११ रोजी माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी नराळे हबीसेवडी आणि सोनंद परिसरातील वाड्या वस्त्यांवर जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला व त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या.

यावेळी साहेबराव बाबर, सुधाकर लंबे, रणजीत वाघमोडे, बंडू गेजगे, श्रीकांत गेजगे, राहुल वाघमोडे, उद्धव मोरे, दिनकर लंबे, संदीप बाबर, प्रोजीत भोसले, सदाशिव भोसले, पिंटू भोसले, योगेश इंगोले, नरेंद्र



**सांगोला** : राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मा.आमदार दिपकआबा साळुंखे-पाटील यांचा गावभेट व जनसंवाद दौरा चर्चा करताना.

गायकवाड, बाळासो यादव, मधुकर इंगवले, अतुल नलवडे, बाळू गळवे, महादेव खरात, रामा उतरे, राम बुवा खरात, पांडुरंग खरात, भारत म्हारनुर, दादासो म्हारनुर, अर्जुन खरात आदीसह प्रमुख कार्यकर्ते आणि नराळे हबीसेवाडी परिसरातील नागरिक उपस्थित होते.

नराळे आणि हबीसेवाडी परिसरात नागरिकांनी आपल्या दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या समस्या दिपकआबा साळुंखे पाटील यांच्यासमोर मांडल्या. नराळे गावभाग, वाघमोडे वस्ती, यादव वस्ती, घाडगेवस्ती, बाबर इंगोले वस्ती, उत्तरेवस्ती तसेच हबीसेवाडी परिसरातील नागरिकांच्या स्थानिक रस्ते, शेतीची वीज तसेच प्रशासकीय पातळीवर शिधा पत्रिका शासकीय कागदपत्रे बाबत जाणवणाऱ्या समस्या मांडल्या यावर माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी तात्काळ संबंधित विभागाला फोनवरून सूचना देत नराळे व हबीसेवाडी परिसरातील नागरिकांच्या अडचणी दूर करण्याचे निर्देश दिले.

सोनंद गावात माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांचे ग्रामस्थांच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले. गाव परिसरात सवाद्य मिरवणूक आणि शेकडो महिलांनी औक्षण करून दिपकआबांचे स्वागत केले. यावेळी सोनंद गावचे माजी सरपंच महादेव पाटील, अनिल मोटे, विजय काशीद लोहगावचे सरपंच तात्यासो चव्हाण, संभाजी काशीद यांच्यासह सतीश काशीद, प्रवीण पाटील, अतुल पाटील, दिपक पाटील, राजू पाटील, पप्पू काशीद, धनसिंग चव्हाण, भाऊसाहेब मंडले, समाधान मंडले, साहेबराव काशीद, प्रशांत कोळसे, विनोद काशीद, आदिनाथ सरवदे, बाळासाहेब ढगे, भारत काशीद, सुनील काशीद, शहाजी काशीद, नवनाथ फडतरे, संजय काशीद गुरुजी, बबन काशीद, चंद्रकांत काशीद, किसन बोराडे, महादेव काशीद, प्रवीण यादव, तुकाराम यादव, तुकाराम काशीद, अण्णासाहेब काशीद, भीमराव काशीद, बाळासाहेब खंडागळे, नंदकुमार काशीद, आनंदा नायकुडे, कल्याणराव भोसले, तात्यासो चव्हाण, तानाजी आगलावे आणि सुरेश गवंड आदी प्रमुख कार्यकर्त्यांसह नागरिक उपस्थित होते.

यावेळी माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी सोनंद बस स्टॉप परिसर, शिवाजी चौक, सय्यद बाबा मठ, संजय काशीद गुरुजी यांच्या वस्तीवर आदी ठिकाणी भेटी दिल्या.

# विधानसभेसाठी महाराष्ट्र बहुजन सन्मान पार्टी २५ पेक्षा जास्त जागा लढवणार

**पक्षाचे संस्थापक मारुती केसकर यांची पत्रकार परिषदेत घोषणा**

**पंढरपूर/प्रतिनिधी**

राज्यात विधानसभेचे वारे जोरदार वाहू लागले आहे. विविध राजकीय पक्षांनी आपापल्या परीने जयदत्त तयारी सुरू केली आहे. अशातच महाराष्ट्र बहुजन सन्मान पार्टीनेही या आगामी विधानसभा निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी या पक्षाकडून २५पेक्षा जास्त विधानसभा मतदारसंघांमध्ये उमेदवार उभे करण्याचा निर्णय घेतला असल्याची घोषणा पक्षाचे संस्थापक मारुती केसकर यांनी केली आहे.

पंढरपूर येथील शासकीय विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत पुढे केसकर म्हणाले की, 'आमचा पक्ष हा अधिकृत पक्ष म्हणून भारत निर्वाचन आयोगाकडून घोषित करण्यात आला आहे. यामुळे आगामी विधानसभा लढविण्यात येणार आहेत.'

आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने, राज्यात प्रस्थापित मंडळींना धक्का देण्यासाठी, तिसरी आघाडी निर्माण होऊ पाहत आहे. या तिसऱ्या आघाडीत आमचा पक्ष सामील होऊन आम्ही मोठ्या ताकतीने निवडणूक रिंगणात उतरणार असल्याचेही सांगितले. आजवर राज्यांमध्ये जे सत्ताधारी



होते, त्यांनी शेतकऱ्यांवर केवळ अन्यायच केला. कायम शेतकरी विरोधी धोरणे राबविल्यामुळे शेतकरी रसातळाला गेला आहे. याबाबत आपला पक्ष यापुढील काळात केवळ शेतकऱ्याची हिताची धोरणे राबवून, शेतकऱ्यांना जीएसटी मुक्त करणार असल्याचे सांगितले.

सरकारकडून शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टरसाठी टोल मुक्ती मिळावी. शेतकऱ्यांच्या पिकाला हमीभाव मिळावा. शेतकऱ्यांच्या पिकाचे झालेले नुकसानीची पंधरा दिवसात भरपाई मिळावी. नुकसान भरपाईच्या ७५ टक्के किमान रक्कम मिळावी. यासह विविध विषय डोळ्यासमोर ठेवून शेतकऱ्यांच्या हितासाठी आपण सरकार पुढे मागणी करणार असल्याचेही केसकर यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेच्या वेळी जे. के. गायकवाड, वसंत हाके, एडवोकेट यासीन शेख, एडवोकेट विजय हिरवे, प्राचार्य तानाजी केसकर, सचिन तांदळे, संजय माने, संजय लेंगरे, अन्सार मुलानी, बापूसाहेब लवटे यांचेसह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

### महात्मा फुले ब्रिगेडच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी गणेश घाडगे यांची निवड

**माढा** : समाजासाठी कायम कार्यरत असणाऱ्या व समाजाचे प्रश्न तळमळीने मांडणाऱ्या महात्मा फुले ब्रिगेड या सामाजिक संघटनेच्या सोलापूर जिल्हा कार्याध्यक्षपदी अकोले खुर्द, तालुका माढा येथील तरुण युवक कार्यकर्ते गणेश घाडगे यांची निवड झाली असून त्यांच्या निवडीबद्दल समाजाच्या सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. समाजातील सर्वसामान्य गोरगरीब यांच्या सामाजिक आर्थिक प्रशासकीय व राजकीय समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असून



राज्यस्तरावरील नेतेमंडळींनी टाकलेला विश्वास सार्थ करणार आहे. सामाजिक कार्याची आवड आणि समाजासाठी आतापर्यंत केलेल्या कार्याची दखल घेत म. फुले ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष स्वप्निल बोबडे, प्रदेशाध्यक्ष डॉ. सुनील देवरे, महिला आघाडी प्रदेश संघटक आशा घाडगे, जिल्हाध्यक्ष अमरावती देवानंद भुस्कट यांच्या मार्गदर्शनाखाली निवड करण्यात आली.

# तालुक्याचा विकास करण्याची मनात जिद्द असावी

● विजय चौगुले यांचे प्रतिपादन




**सांगोला : नवी मुंबईचे जिल्हाप्रमुख तथा सांगोला विधानसभा निवडणूक प्रभारी विजय चौगुले अन् आमदार शहाजी पाटील यांचा सत्कार करताना कार्यकर्ते व पदाधिकारी.**

**सांगोला/प्रतिनिधी**

सांगोल्यात रेकॉर्ड होईल इतकी शिवसेनेची ताकद निर्माण झाली आहे. कार्यकर्ता सक्षम करण्यासाठी ठोस निर्णय घेतले. शहाजीबापूंना ५० हजारांचे लीड द्या, शंभर टक्के शहाजीबापू मंत्री होतील. शिवसेनेच्या प्रत्येक कार्यकर्त्याला बूथवर जाऊन काम करावे लागेल. शहाजीबापूंनी तालुका सुजलाम् सुफलाम् केला आहे. या तालुक्याचा विकास करण्याची मनात जिद्द असावी लागते. पराभवाचा विचार न करता मी माणसं जागं करीत गेलो.यावेळी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना नवी मुंबईचे जिल्हाप्रमुख तथा सांगोला विधानसभा निवडणूक प्रभारी विजय चौगुले बोलत होते.

येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचे ८० आमदार निवडून येतील. विरोधकांच्या टीकेकडे दुर्लक्ष करून शहाजीबापूंना आमदार करण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवावे. निष्ठावंत, कट्टर शिवसैनिक हीच शहाजीबापूंची खरी ताकद आहे. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचे आमदार शहाजीबापू पाटील यांना ५० हजारांच्या मताधिक्क्याने विजयी करण्यासाठी शिवसैनिकांनी आतापासूनच कामाला लागावे, असे आवाहन नवी मुंबईचे जिल्हाप्रमुख तथा सांगोला विधानसभा निवडणूक प्रभारी विजय चौगुले यांनी केले.

सांगोला विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक सदानंद मल्टीपर्पज हॉलमध्ये घेण्यात आली होती.

यावेळी आमदार शहाजीबापू पाटील म्हणाले की, 'माझ्या घरात कुणीतरी आमदार होतं, म्हणून मी आमदार होणार ही कल्पनाच मला आवडत नाही.

सिंचन प्रकल्पाचे पाणी मिळाल्याने शेती समृध्द होत आहे. सर्वसामान्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी मी आयुष्यभर चळवळ सुरू केली होती. तहसीलदार कार्यालयासमोर मायबाप जनतेला ज्या ज्या योजनेचं पाणी आणण्याचा दिलेला शब्द आज पूर्ण झाला आहे. जे स्वप्न पाहिलं होतं ते आज पूर्ण होत असल्याचं समाधान आहे. एकाच आठवड्यात तालुक्यातील सातही जिल्हा परिषद गटात सात एमआयडीसी करणार असल्याचा विश्वास दिला. वर्षभरात तालुक्यातील सर्वच शेती ओलिताखाली येणार आहे. माझं वय मोजायच्या भानगडीत पडू नका. आणखी २५ वर्षे राजकारणात सक्रीय राहणार आहे. तालुक्याचा प्रत्येक प्रश्न जिव्हाळ्याने सोडवत असा विश्वास आमदार शहाजीबापू पाटील यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविक दादासाहेब वाघमोडे यांनी केले. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश

# उजनीच्या निर्मितीसाठी योगदान दिलेल्या धरणग्रस्तांचे स्मरण करून ढोकरी येथे तहसीलदार ठोकडे यांच्या हस्ते पाणी पूजन

**करमाळा/प्रतिनिधी**

गतवर्षी अल्प पावसाने पाणी टंचाई निर्माण झाली होती. उजनी काठावरील शेती, पाणी पुरवठा योजना धोक्यात आली होती. परंतु यावर्षी जूनपासूनच पुणे परिसरातील घाटमाथ्यावरील पावसाने उजनी शंभर टक्के भरले आहे. या पार्श्वभूमीवर गुरुवार दि. ८ ऑगस्ट रोजी तालुक्यातील ढोकरी येथे करमाळा तहसीलदार शिल्पा ठोकडे यांच्या हस्ते आणि पंचक्रोशीतील मान्यवरांच्या उपस्थितीत यशवंत सागर जलाशयाची खणा-नारळाने ओटी भरून हलगीच्या आवाजात पाणीपूजन करण्यात आले.

यावेळी तहसीलदार शिल्पा ठोकडे म्हणाल्या की, 'उजनी धरणग्रस्तांनी उजनीच्या निर्मितीसाठी मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या त्यागातूनच उजनी जलाशय काठावर तसेच लाभक्षेत्रातील शेती, गावे, समृद्ध झाली असून अहिल्यानगर, सोलापूर, पुणे आदी जिल्ह्यांत विकासाची गंगा वाहत आहे. त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे आपले उत्तरदायित्व आहे. उजनी धरणग्रस्तांनी पाणी पूजनाच्या



**करमाळा** : तहसीलदार शिल्पा ठोकडेंच्या हस्ते यशवंत सागर जलाशयाची खणा-नारळाने ओटी भरून पाणीपूजन केले.

निमित्ताने ज्यांनी उजनीसाठी त्याग केलेल्या लोकांचे स्मरण केले याचा व उजनी जलाशयास भेट दिल्याचा मोठा आनंद वाटतो.

कार्यक्रमाचे संयोजक आणि उजनी धरणग्रस्त संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रा. शिवाजी बंडगर यांनी प्रास्ताविकेत उजनी जलाशयातील १२३ टीएमसी पाण्याचे योग्य नियोजन करण्यावर भर दिला. उजनी धरणग्रस्तांच्या हक्काचे पाणी बेसुमार, नियोजन बाह्य व बेकायदेशीरपणे सोडण्यामुळे त्यांना टंचाईच्या काळात मिळत नाही. हा उजनीचे खरे मालक असलेल्या धरणग्रस्तांवर अन्याय आहे. उजनीसाठी त्याग केलेल्या लोकांचे स्मरण करणे, पाण्याच्या योग्य नियोजनाचा आग्रह धरणे आणि निसर्गाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हा जलपूजनाच्या उद्देश असतो.

उपस्थितांचे स्वागत व सूत्रसंचालन अर्जुन आबा तकीक यांनी केले तर आभार महेंद्र पाटील यांनी मानले. या कार्यक्रमास आदिनाथचे उपाध्यक्ष शहाजीराव देशमुख, संघर्ष समितीचे उपाध्यक्ष भारत साळुंके यांच्या सह उजनी धरण व्यवस्थापन कार्यालयाचे कनिष्ठ अभियंता समाधान डुबल, सहाय्यक अभियंता प्रणाली माने, मंडलाधिकारी प्रशांत जगताप, वांगीचे सरपंच संतोष देशमुख, माजी सरपंच विठ्ठल शेळके, दत्ता देशमुख, बाजार समितीचे माजी संचालक बापूराव रणशिंग, वांगी सोसायटीचे अध्यक्ष रवींद्र देशमुख, संचालक विकास पाटील,तहसीलदार ठोकडे उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



सोलापूर : एस. रंगनाथन यांचा अभिवादन करताना डॉ. श्रीकांत कामतकर, डॉ. श्रीकांत येळेगावकर व इतर.

### ग्रंथालय शास्त्राचे ध्यासपर्व म्हणजे रंगनाथन : डॉ. कामतकर

**सोलापूर** : ग्रंथालय शास्त्राचे जनक' म्हणून ज्यांचा नावलौकिक होता, ते पद्मश्री डॉ. एस.आर.रंगनाथन हे ग्रंथालय शास्त्राचे ध्यासपर्व होते. ग्रंथालयांच्या शास्त्रशुध्दी- करणासाठी आणि पुस्तकांच्या वर्गासाठी तसेच द्वीवर्ग, ग्रंथालय शास्त्राची पंचसूत्री, तयार केली. त्यांच्या योगदानासाठी रंगनाथन यांना आपला देश कधीही विसरु शकत नाही, अशी माहिती हिराचंद नेमचंद वाचनालयाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत कामतकर यांनी दिली. हि.ने. वाचनालयात डॉ. रंगनाथन यांची जयंती आणि ग्रंथपाल-दिना निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, त्यावेळी वाचनालयाचे डॉ.कामतकर बोलत होते. रंगनाथन यांनी तयार केलेली पंचसूत्री म्हणजेच ग्रंथालयशास्त्राचा पाया असल्याचे वाचनालयाचे अध्यक्ष डॉ.श्रीकांत येळेगावकर यांनी यावेळी सांगितले. या प्रसंगी वाचनालयाच्या प्रमुख कार्यवाह नभा काकडे, ग्रंथपाल दत्ता मोरे, यांनीही रंगनाथन यांच्याबद्दल मनोगत व्यक्त केले. यावेळी माधुरी करंटे सहाय्यक ग्रंथपाल, मुदूला फडतरे-देशमुख, प्रभा पाटील, सुधीर कुलकर्णी, जगदीश इमडशेट्टी, सुचेता फडके आदी उपस्थित होते.



सोलापूरः ओ गानेवाली कार्यक्रमात कलाकृती सादर करताना अवंती पटेल, ऋतुजा लाड.

### ओ गानेवाली कार्यक्रमाने रसिकश्रोते झाले मंत्रमुग्ध

**सोलापूर** : येथील प्रा. श्रीराम पुजारी यांच्या जन्मशताब्दी उत्सवाच्या उद्घाटनाच्या निमिताने ओ गानेवाली' हा सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम हि.ने. वाचनालयाच्या डॉ वा. का. किर्लो स्कर सभागृहात झाला. अवंती पटेल, ऋतुजा लाड या गायिकांना सारंगीवर संदीप मिश्रा, तबल्यावर अक्षय जाधव व संवादिनीवर नुसरत अपूर्व यांनी साथ दिली. गझल, दादरा, बंदिशी या शास्त्रीय व उपशास्त्रीय गायनातून बेगम अखतर, शोभा गुर्टू या गायिकांच्या कलाकृती ऐकवल्या. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. सुलभा पिशवीकर यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी प्रा. पुष्पा आगरकर, डॉ श्रीकांत कामतकर, डॉ. नभा काकडे, दत्ता गायकवाड, अॅड. धनंजय माने, पं.आनंद बदामीकर, भगवान रामपुरे, प्रशांत देशपांडे, डॉ. संध्या विजय रघोजी, मंजुषा गाडगीळ, डॉ. केदार व गौरी कहाते, डॉ. सुहास पुजारी, मोहन सोहनी, डॉ. बाहुबली दोशी, ज्योती जोशी, अण्णासाहेब कोथली, डॉ. उमा प्रधान, ड जे. जे. कुलकर्णी, पद्माकर कुलकर्णी, अण्णासाहेब राजमाने, गुरुशांत धुतरगावकर, विलास कुलकर्णी अरविंद जोशी आदी उपस्थित होते.

### श्री सिद्धेश्वर भोजनालयाचा सोलापुरात गुरुवारी शुभारंभ

**सोलापूर** : श्री सिद्धेश्वर भोजनालय या शुद्ध शाकाहारी हॉटेलचे उद्घाटन गुरुवार दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११:३० वाजता जुळे सोलापुरातील ओम गर्जना चौक जवळील रोहिणी नगर भाग - १ येथे होणार आहे ,अशी माहिती निमंत्रक काशिनाथ भतगुणकी यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी गुरुशांत भतगुणकी, गजराबाई भतगुणकी यांच्या हस्ते शुभारंभ होणार आहे. याप्रसंगी परमेश्वर भतगुणकी, कल्लप्पा भतगुणकी, बसम्मा पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या ठिकाणी चुलीवरची गरम ज्वारी - बाजरीची भाकरी, धपाटे, शेंगापोळी, खवापोळी, बेसन पीठला, पेंड पाला ,गावरान भाजी, गरगट्टा हुग्गी, दही, शेंगा चटणी, जवस चटणी आदी पदार्थ मिळणार आहेत. सेंद्रिय भाजीपाल्याचा वापर करण्यात येत आहे, असे काशिनाथ भतगुणकी यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस सिद्धारूढ इटनळी अजय निरोळी, रेवणसिद्ध नरोळे आदी उपस्थित होते.

### बेलाटी येथील बाळूमामा मंदिरास रोपांचे वाटप

**सोलापूर** : भारतीय हिंदराज सेना सोलापूर व धाराशिव जिल्ह्याच्यावतीने रोपांचे वाटप करण्यात आले. यावेळी बाळूमामाच्या नावाने चांगभलेचा नारा देण्यात आला. यावेळी भारतीय हिंदराज सेनाचे धारासिंह राजपूत, आयोजक समिती चेअरमन हणमंराव पाटील, पुजारी सुनिल काटकर, विजय वाघमोडे, शेंडगे, सुनीता पाटील, सुगंधा गुजरे, समर्थ गुजरे, देवीदास कजागवाल, अरबाज शेख, सुनिल सरवदे, राजू गायकवाड आदी उपस्थित होते.

# फेक नरेटिव्ह मोडीत काढा; महायुतीची कामे जनतेपर्यंत पोहोचवा

## आमदार सुभाष देशमुख यांचे आवाहन


## दक्षिण भाजप विधानसभा मतदारसंघाची बैठक

**सोलापूर/प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत फेक नरेटिव्हमुळे आपल्याला काही प्रमाणात फटका बसला. आपण यातून बाहेर येऊन सर्वांनी याला ताकदिनी उत्तर द्यायला सुरुवात करावी. विरोधकांना आपण केलेले काम पचत नसल्यामुळे ते नकारात्मक गोष्टी पसरवत असतात. विरोधकांचे फेक नरेटिव्ह खोडून काढा आणि महायुतीची कामे लोकांपर्यंत पोहोचवा असे आवाहन आमदार सुभाष देशमुख यांनी केले.

भाजप दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघाची विस्तारित मंडल कार्यकारणी बैठक जगदीश मंगल कार्यालय सोलापूर येथे पार पडली,या बैठकित मार्गदर्शन करताना आ. देशमुख बोलत होते. यावेळी आमदार देशमुख पुढे म्हणाले की,केंद्र आणि राज्य सरकारने महिलांसाठी अनेक योजना सुरू केल्या आहेत त्याची जास्तीत जास्त माहिती महिलांपर्यंत पोहोचवा महिलांचे मतदान मोठ्या प्रमाणात करून घ्या.

यावेळी जिल्हा सरचिटणीस मनिष देशमुख म्हणाले की, दक्षिण सोलापूर तालुका हा मॉडेल करण्याचा प्रयत्न आ. सुभाष देशमुख यांनी केलेला आहे. ग्रामीण भागासह शहरातील अनेक महत्वाचे प्रश्न मार्गी लावून दूरदृष्टी ठेवून दक्षिण सोलापूर चा विकास करण्यात आलेला आहे.



सोलापूर : विस्तारित मंडल कार्यकारणी बैठकीचे उद्घाटन करताना आ. सुभाष देशमुख. सोबत हणमंत कुलकर्णी,जेष्ठ नेते भीमाशंकर नरसगोंडे, गुरन्ना तेली आदी.

### बूथ जिंकण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करा

नवमतदार नोदणी अभियान सुरु असून याद्या छाननी करून घेऊन जास्तीत जास्त नोंदणी करावी. बूथ मजबूत असेल तर विधानसभा मजबूत होईल त्यामुळे बूथ जिंकण्यासाठी सर्वांनी काम करावे. केंद्र व राज्यसरकार व आपण केलेली कामे जनतेपर्यंत पोहचवणे आवश्यक आहेत, असे आमदार देशमुख म्हणाले.

सिंचनातून तालुका सुजलम सुफलम होत आहेत. सीना भिमा जोड कलवा, वडापूर बॅरेज, तिऱ्हे बॅरेज, यासह बंधाऱ्याची दुरुस्ती करून तालुक्याला पाणी उपलब्ध करून दिले आहेत.

यावेळी निवडणूक प्रमुख हणमंत कुलकर्णी,जेष्ठ नेते भीमाशंकर नरसगोंडे, गुरन्ना तेली, जिल्हा नियोजन समिती सदस्य डॉ. चनगोंडा हवीनाळे, जिल्हा सचिव रामप्पा चिवडशेट्टी, शहर सरचिटणीस विशाल गायकवाड, डॉ. शिवराज सरतापे, अर्चना वडनाळ, सांगप्पा केरके, राम जाध, आनंद बिराजदार, अर्जुन जाधव व पदाधिकारी उपस्थिती होते.

### सहा वर्षीय यशवर्धन करणार लाठी फिरवण्याचा विक्रम

**सोलापूर** : स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने १५ ऑगस्ट रोजी सहा वर्षीय विद्यार्थी यशवर्धन सतीश रेब्बा हा ७८ मिनिट म्हणजेच सलग सव्वा तास दोन्ही हाताने दोन लाठी फिरवण्याचा विक्रम करणार आहे, अशी माहिती सोलापूर शहर - जिल्हा लाठी असोसिएशनचे सचिव अश्विन कडलासकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.



युनिकॉर्न बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये याची नोंद होणार आहे. सोलापूर शहर - जिल्हा लाठी असोसिएशन व पद्मशाली समाज संचलित नारायणराव कुचन प्रशालेच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम होणार आहे. १५ ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता राजेंद्र चौक येथील बुर्ला महाविद्यालयात या उपक्रमास सुरुवात होणार आहे. संघटनेचे उपाध्यक्ष शिवराम भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने आतापर्यंत राष्ट्रीय, राज्यस्तरीय व एशियन लाठी स्पर्धेमध्ये यश मिळविले आहे. या पत्रकार परिषदेस शिवराम भोसले, यशवर्धन रेब्बा, पूनम रेब्बा आदी उपस्थित होते.

**सहकार महर्षी वि.गु. शिवदारे स्मृती समारोह**

### एकापेक्षा एक सरस कवितांना रसिक श्रोत्यांची भरभरून दाद

**सोलापूर/प्रतिनिधी**

प्रेमकवितेतून व्यक्त झालेला प्रियकर, भाव कवितेतून व्यक्त होणारी तरुणी निसर्गाच्या विविधरूपांना शब्दांचे कोंदण देऊन कवितेच्या माध्यमातून उभे केलेल्या निसर्ग चित्रणा बरोबरच अरसल लावणीचा ठसका सहकार महर्षी वि.गु.शिवदारे स्मृती समारोह निमित्त आयोजित कवी संमेलनात अनुभवता आला.

सहकार महर्षी वि.गु. शिवदारे स्मृती सोहळ्या निमित्त महाविद्यालयातील विद्यार्थी आणि प्राध्यापकांना ही संधी उपलब्ध करून दिली. यावेळी मसाप जुळे सोलापूरचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, प्रा. भीमाशंकर शेटे, नरेंद्र गंभीरे यांच्या प्रमुख उपस्थितीत कवींचे संमेलन रंगले. याप्रसंगी ग्राहक भांडारचे चेअरमन सिद्धाराम जोडभावी, महादेव बिराजदार, प्राचार्य डॉ. आर. वाय. पाटील, प्राचार्य डी. एस सूत्रावे, प्राचार्य श्रुती गायकवाड, पूजा बाजपेयी, प्राचार्य डॉ. जी. के. कापसे, योगीराज वाघमारे, कैलास माणिकशेट्टी, श्रीकांत कुलकर्णी आदी उपस्थित होते. या कवी संमेलनात एकापेक्षा एक अशा सरस कविता सादर केल्या. माधव पवार यांनी आपल्या विनोदी आणि ढंगदार शैलीने काव्य संमेलनाचे सूत्रसंचालन केले.



सोलापूर : कवी संमेलनाप्रसंगी पद्माकर कुलकर्णी, प्रा. भीमाशंकर शेटे, डॉ. विद्या देशपांडे, मारुती कटकधोंड, डॉ. क्षमा वळसंगकर व इतर.

#### यांनी सादर केल्या कविता

या कवी संमेलनात कवियत्री बालरोगतज्ज्ञ डॉ. विद्या देशपांडे, मारुती कटकधोंड, कवियत्री आणि भूलतज्ज्ञ डॉ. क्षमा वळसंगकर, रामचंद्र धर्मसाले, कवियत्री प्रांजली मोहीकर, कवी गिरीश दुनाखे, कवयित्री वंदना कुलकर्णी आणि डॉ.माधुरी भोसले यांनी कविता सादर केल्या.

### जगदंब नर्सरी तर्फे सोलापुरात गिफ्ट शॉपी प्रदर्शन व विक्री

**सोलापूर** : जगदंब नर्सरीच्या वतीने मंगळवार दि. १३ ऑगस्टपासून सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत हॉटेल सरोवर समोरील कोकण फॅमिली टेरेस येथे गिफ्ट शॉपी प्रदर्शन व विक्रीचे आयोजन करण्यात आले आहे. गौरी व गणपती सणानिमित्त देखाव्यासाठी सजावट साहित्य येथे उपलब्ध होणार असल्याची माहिती संयोजक धारासिंह राजपूत यांनी पत्रकार परिषदेत दिली. या ठिकाणी सुमारे दीड हजार प्रकारचे गिफ्ट व सजावट साहित्य उपलब्ध राहणार आहे. वेगवेगळ्या रंगाचे दगडही इथे पाहायला मिळणार आहेत या प्रदर्शनासाठी प्रवेश विनामूल्य आहे नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक धारासिंह राजपूत यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस अरबाज शेख, देविदास कजागवाले, राजू गायकवाड आदी उपस्थित होते.

### रशियातील टंगस्टन धातूच्या मल्बिडेन शिखरावर १२ हजार फूट उंच चढाई

**एव्हरेस्टवीर आनंद बनसोडे यांनी केली मोहीम आयोजित**

**सोलापूर** : युरोपातील सर्वोच्च शिखर माऊंट एलब्रूसवर भारतातील ११ जण मोहिमेवर गेले असून १५ ऑगस्ट रोजी तिरंगा फडकवून इतिहास घडवनार आहेत. यापूर्वीच ११ ऑगस्ट रोजी टीमने मल्बिडेन नावाचे शिखरावर १२ हजार फूट उंचीवर चढाई केली आहे. एव्हरेस्टवीर आनंद बनसोडे यांनी केली मोहीम आयोजित केली होती.




सोलापूरः मल्बिडेन शिखर सर केलेल्या दत्ता सरोदे, डॉ. प्रशांत काळे, विनोद विभुते यांच्यासोबत आनंद बनसोडे.

संभाजीनगर येथील दत्ता सरोदे, डॉ. प्रशांत काळे, किशोर नवकर, विनोद विभुते, सुरज सुलाने, रुपाली कचरे तसेच मैसूर येथील प्रीत केएस, लातूर येथील अजय गायकवाड, मध्यप्रदेश येथील चेतन परमार व १२ वर्षाची प्रीती सिंग यांनी या शिखरावर चढाई केली. कोणतेही उंच शिखर सर करण्याआधी उंचीवरील कमी ऑक्सिजनला आपले शरीर अनुकूल होण्यासाठी आधी छोटे शिखर सर केले जाते. याचा सराव म्हणून टीमने हे शिखर सर केले. याशिखरावर जाण्यापूर्वी रशियन आर्मीची परवानगीही टीमला मिळवावी लागली. ३६० एक्सप्लोरर मार्फत ही मोहीम आयोजित केली आहे.

### उद्योजक रामरेड्डी यांचा सत्कार

**सोलापूर** : तेलुगू भाषा अभिवृध्दी सार्वजनिक ग्रंथालय व एन.टी.आर. अभिमान सगम यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजक डी. रामरेड्डी यांना विद्यापीठातर्फे जीवन गौरव पुरस्कार मिळाल्याने संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मल्लिकार्जुन कमटम, जिल्हा यंत्रमागधारक संघाचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, उपाध्यक्ष श्रीनिवास गाली, तसेच तिप्पण्णा गणेरी, सचिव, सहसचिव प्रभाकर भिमनाथ सर, श्रीनिवास यनगंदूल आदी उपस्थित होते.

## बॉक्सिंग स्पर्धेत गांधीनाथा विद्यालयास दहा पदके

**सोलापूर/प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व सोलापूर महापालिकेच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित शालेय सोलापूर शहर स्तरीयबॉक्सिंग स्पर्धेत गांधी नाथा रंगजी विद्यालयांच्या खेळाडूंनी यश संपादित केले

या स्पर्धेत १९ वर्षाखालील वयोगटात ५२ ते ५७ किलो वजन गटात वैष्णवी ढेंगळे द्वितीय क्रमांक, ६९ ते ७५ किलो वजन गटात जिडग जिडगे द्वितीय क्रमांक, क्षिप्रा तडकासे तृतीय क्रमांक, ४८ ते ५१किलो वजन गटात नंदीनी दहिहंडे तृतीय क्रमांक, ५७ ते ६० किलो वजन गटात साक्षी नलोगल तृतीय क्रमांक, आदिती जवान तृतीय क्रमांक पटकावला आहे. १७ वर्षाखालील वयोगटात ७० ते ७५ वजन गटात समृद्धी ढेरे तृतीय क्रमांक, ४६ ते ४८ किलो वजन गटात हर्षदा अलकुंटे तृतीय व ४८ ते ५१ वजन गटात संयुक्ता ताटे तृतीय क्रमांक ३५ ते ३८ वजन गटात सम्राट वाघमारे यांनी द्वितीय क्रमांक पटकवला.



सोलापूर : बॉक्सिंग स्पर्धेत यश मिळवलेल्या गांधी नाथा विद्यालयातील विद्यार्थ्यांसमवेत शिक्षक.

मुलांचे संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका स्मिता पुरवत, मुख्याध्यापिका सरोजना मुलिंटी यांनी अभिनंदन केले आहे. खेळाडूंना क्रीडा शिक्षक शिवानंद सुतार यांचे मार्गदर्शन लाभले.

### बालवाडी शिक्षिका व सेविकांचे थकीत मानधन देण्याची मागणी

**सोलापूर/प्रतिनिधी**

महापालिकेकडील बालवाडी शिक्षिका व सेविकांचे थकीत मानधन द्यावे. मानधनात एक हजार रुपयांनी वाढ करावी आदी मागण्यांचे निवेदन बालवाडी शिक्षिका व सेविका महिला कर्मचारी संघटना मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ सोलापूरच्या वतीने उपायुक्त तैमूर मुलाणी यांना देण्यात आले. महापालिकेच्या शाळा बंद पडत चालल्या होत्या तेव्हा १९८५ मध्ये समाज मंदिर मध्ये चालणाऱ्या बालवाड्या शिक्षण मंडळास जोडल्या. बंद पडणा-या शाळेचा पट वाढवणे, पटसंख्या टिकवणे यात बालवाडी शिक्षिका व सेविका यांचे महत्वाचा वाटा आहे. सुरुवातीला बालवाडी कर्मचारी यांचे १५० रुपये इतके मानधनापासून सुरु केलेली आहे. मानधनात १ हजार रुपयांची वाढ करावी, असे निवेदनात म्हटले आहे. निवेदन देतेवेळी राज्य अध्यक्ष शंतनू गायकवाड, गणेश अंजिखाने, रामेश्वरी बेरूणगी, अंजली कोळी, जगदेवी तोडकरी, लता शिंदे , परवीन बेलीफ , लक्ष्मी भीमर्थी, विद्या साखरे, नाझिया कोटी, शुभदा पवार, अंजली नागणे, रईसा मेगेरी आदी उपस्थित होते.

### बँकांनी सिबिल स्कोअर ही संकल्पना रद्द करा

**सोलापूर/प्रतिनिधी**

कायद्यानुसार कर्ज म्हणजे काय आणि कर्जाची व्याख्या स्पष्ट करावी तसेच सिबिल स्कोर ही संकल्पना रद्द करावी, अशी मागणी पक्षकार संघाच्या वतीने राज्य सहसचिव बसवराज येरनाळे यांनी पत्रकार परिषदेत केली आहे. भारताचे चलन रुपया म्हणजे काय आणि रुपया वास्तवात कसा दिसतो ते स्पष्ट करावे. राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, पतसंस्था, फायनान्स कंपन्या ग्राहकांना कोणत्या रुपयात कर्ज देते याचा तपशील स्पष्ट करावा. सिबिल स्कोअर या नावाने नागरिकांमध्ये दहशत, भीती निर्माण करून नागरिकांची पत, प्रतिष्ठा व सन्मान याला धक्का पोहोचवणारी व केवळ बँकांचा फायदा व्हावा या हेतूने सिबिल स्कोअर निर्माण केले आहे. सिबिल स्कोअर ही संकल्पनाच रद्द करावी या मागणीसाठी जिल्हाधिकारी तसेच वरिष्ठ पातळीवर निवेदन पाठविण्यात आली आहेत, असेही बसवराज येरनाळे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस बाबुराव मैंदर्गीकर, सतीश शिंदे आदी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत ६९९ प्रशिक्षणार्थी भरणार

## अर्ज करण्याचा आज शेवटचा दिवस

**सोलापूर/प्रतिनिधी**

मुख्यमंत्री कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत सोलापूर जिल्हा परिषदेच्या विविध संवर्गातील मंजूर पदांच्या ५ टक्के प्रमाणे एकूण ६९९ प्रशिक्षणार्थी यांची निवड करावयाची आहे. त्यासाठी शैक्षणिक पात्रता १२ वी, पदवी, पदविका, पदव्युत्तर पदवी अशी आहे. तसेच ग्रामपंचायत स्तरावर निवडीसाठी योजनादुत प्रशिक्षणार्थी म्हणून १०२२ प्रशिक्षणार्थी भरावयाचे आहेत. त्यासाठी शैक्षणिक अर्हता इयत्ता १२ वी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

या कार्य प्रशिक्षणाचा कालावधी ६ महिने असेल, प्रशिक्षणार्थीला शैक्षणिक अर्हतेप्रमाणे १२ वी पास रूपये ६ हजार, आयटीआय, पदविका रुपये ८ हजार, पदवीधर/ पदवीत्तर रुपये १० हजार प्रतिमाह विद्यावेतन दिले जाईल.

पात्र युवक उमेदवारांना कौशल्य विभागाच्या https:// rojgar.mahaswayam.gov.in/ admin या वेबसाईटवर अर्ज दाखल करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडून आवाहन करण्यात आले आहे.

### हे उमेदवार करू शकतात अर्ज

अर्ज करण्यासाठी अट– उमेद्वार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा, उमेदवाराचे किमान वय १८ वर्ष व कमाल वय ३५ वर्ष असावे, उमेदवाराची आधार नोंदणी, तसेच उमेदवाराचे बँक खाते आधार संलग्न असावे, इच्छुक उमेदवारांनी विभागाच्या https:// rojgar.mahaswayam.gov.in/admin या संकेतस्थळावर नोंदणी करणे बंधनकारक आहे व पोर्टलवरील पदांसाठी`पश्रळपश श्रिॢ करणे आवश्यक आहे,

युवक उमेदवारांना अर्ज करण्याचा कालावधी ते १३ ऑगस्ट २०२४ रोजी पर्यंत असेल, असे मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी कळविले आहे. अधिक माहितीसाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय दि.९ जुलै २०२४ चे वाचन करावे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी आव्हाळे यांनी सांगितले.




### ६ महिने असणार प्रशिक्षण कालावधी

मुख्यमंत्री युवाकार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे जिल्हा परिषद सोलापूरच्या आस्थापनेमधील मजूर पदाच्या ५ टक्के उमेदवार ६ महिने या कालावधीकरिता कार्यप्रशिक्षणासाठी घेण्यासाठी कौशल्य विकास विभागाच्या संकेतस्थळावर लिंक प्रसिध्द करण्यात आली आहे.

# सर्व्हेमुळे भाजपची कोंडी

## विधानसभेसाठी नव्या चेहऱ्यांना द्यावी लागणार संधी

## विद्यमान आमदारांना फटका बसणार

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**लोकसभा निवडणुकीत महायुतीला मोठा फटका बसला. त्यामुळे आगामी वधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीकडून ताकही फुंकून पिले जात आहे. राज्यातील सत्ता कायम राखण्यासाठी भाजपने आतापासूनच प्रयत्न सुरु केले आहेत. त्यासाठी भाजपने अंतर्गत सर्वेक्षण करण्यात आले. या सर्व्हेमुळे भाजपची कोंडी झाली आहे. अनेक आमदारांच्या जागी नवे चेहरे दिल्यास पक्षाला ८० ते ९० जागा मिळतील, असे सर्व्हेमुळे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे विद्यमान आमदारांना फटका बसणार आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील भाजप आमदारांनीही या सर्व्हेचा धसका बसला आहे.**



भाजपने २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत १०५ जागा जिंकल्या होत्या. यंदाच्या निवडणुकीत भाजप १५० हून अधिक जागा लढवण्याच्या तयारी करीत आहे.

अनेक आमदारांच्या जागी नवे चेहरे दिल्यास पक्षाला ८० ते ९० जागा मिळतील, असे सर्व्हेमुळे स्पष्ट झाले आहे.

त्यामुळे अनेक विद्यमान आमदाराना नारळ द्यावे लागणार आहे, त्यामुळे भाजपची डोकेदुखी येत्या काळात वाढणार आहे.

लोकसभेत काही जागांवर अटातटीची निवडणूक पार पडली. त्यामुळे कमी अधिक मताने महायुती व महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी झाले होते. हाच ट्रेंड विधानसभा निवडणुकीत कायम राहण्याची शक्यता असल्याने विद्यमान आमदारांची उमेदवारी कापण्यावरून द्विधा स्थिती झाली आहे. विधानसभा निवडणुकीत भाजपने भाकरी फिरवण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे विधानसभेला भाजप अनेक आमदारांना नारळ देऊन त्यांच्या जागी नव्यांना संधी देणार असल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे नेमकी विधानसभा निवडणुकीसाठी भाजपची रणनीती काय असणार हे समजण्यासाठी अजून काही दिवस वाट पहावी लागणार आहे.

### प्रत्येक आमदाराचे रिपोर्टकार्ड तपासणार

सोलापूर शहर- जिल्ह्यात भाजपाचे शहर उत्तर, दक्षिण, मंगळवेढा-पंढरपूर, अक्कलकोट आणि माळशिरस या पाच जागी आमदार आहेत. येथील आमदारांनाही या सर्व्हेची धास्ती लागली आहे. सध्या तरी कोणत्या आमदारांचे पत्ते कट करायचे याचा काही निर्णय झालेला नाही.प्रत्येक आमदाराचे रिपोर्टकार्ड पाहून उमेदवारी द्यायची काही नाही याचा निर्णय प्रदेश भाजप घेणार आहे.

### वरिष्ठ नेत्यांचा कस लागणार

येत्या निवडणुकीत महायतीकडून तीन तर महाविकास आघाडीकडून तीन असे सहा प्रमुख पक्ष निवडणूक रिंगणात उतरणार आहेत. त्यामुळे एखाद्या विद्यमान आमदारांचे तिकीट कापल्यास ते दुसऱ्या पक्षात जाण्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळे त्यांच्या जागी तिकीट देण्यात आलेल्या उमेदवाराला पाडण्यासाठी तो इतर पक्षाची मदत करू शकतो किंवा विरोधात उमेदवारी घेऊन ऐनवेळी रिंगणात उतरू शकतो. त्यामुळे भाजपच्या वरिष्ठ नेत्यांचा कस लागणार आहे.

# महापालिका आयुक्तांच्या गाडीवर ओतले ड्रेनेजचे पाणी


● भीम आर्मी भारत एकता मिशनने केला महापालिकेचा निषेध

● रमाबाई आंबेडकर नगरातील समस्या सोडवण्याची मागणी

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सम्राट चौक जवळ असलेल्या मातोश्री रमाबाई आंबेडकर नगरात अनेक घरांमध्ये ड्रेनेजचे पाणी पसरते. वारंवार तक्रार करूनही कार्यवाही होत नाही. महापालिकेत निवेदन द्यायला आले असता आयुक्त मीटिंगमध्ये असल्याने भेटणार नाहीत, असे सांगितल्यामुळे संतप्त भीम आर्मी भारत एकता मिशनच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिका आयुक्तांच्या शासकीय गाडीवर ड्रेनेजचे घाण पाणी ओतले आणि निषेधाच्या घोषणा दिल्या.


नगरात अनेक घरांमध्ये ड्रेनेजचे पाणी पसरते. ड्रेनेज तुंबल्यामुळे घरात राहणे ही मुश्किल झाले आहे. वारंवार तक्रार करूनही कार्यवाही होत नाही. महिलांसह भीम आर्मीचे पदाधिकारी महापालिकेत निवेदन द्यायला आले असता महापालिका आयुक्त मीटिंगमध्ये आहेत त्यामुळे त्या भेटू शकणार नाहीत, अशी सूचना करण्यात आली. यामुळे पदाधिकाऱ्यांनी आयुक्तांना आयुक्तांना मीटिंग महत्त्वाची की नागरी समस्या असा सवाल केला. त्यानंतर महापालिका आयुक्तांच्या शासकीय गाडीवर ड्रेनेजचे घाण पाणी ओतले. यावेळी येथील रखवालदारांनी या पदाधिकाऱ्यांना अटकाव केला. महापालिका प्रशासनाच्या अक्षम्य दुर्लक्ष यामुळे या बुद्धविहाराचा अवमान होत असल्याचा आरोप निवेदनात केला आहे.



**सोलापूर : भीम आर्मीच्या पदाधिकाऱ्यांनी आयुक्तांच्या गाडीवर अशाप्रकारे घाणीपाणी ओतले.**

### .. म्हणून गाडीवर घाण पाणी ओतले : मैंदर्गीकर

आयुक्तांना मीटिंग महत्त्वाची आहे की नागरिकांच्या समस्या? याचा जाब विचारण्यासाठीच आणि ड्रेनेज समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी आयुक्तांच्या गाडीवर ड्रेनेजचे पाणी टाकून निषेध केला आहे, असे भीम आर्मीचे जिल्हाध्यक्ष अजय मैंदर्गीकर यांनी स्पष्ट केले.



## सिदेश्वर मंदिरात गर्दी

**सोलापूरः श्रावण सोमवारनिमित्त ग्रामदैवत सिद्धेश्वर मंदिरात भाविकांची मोठी गर्दी झाली होती. इन्सेटमध्ये महाराजांची मूर्ती.**

## जेसीबीला क्रेनची धडक; दीड लाखांचे नुकसान

✔ **अकलूज** : मयत झालेली म्हैस जेसीबीतून नेऊन खड्डा खालून पुरत असताना दुसऱ्या एका क्रेनच्या धडकेने चाकत गंभीर जखमी होऊन जेसीबीचे दीड लाखाचे नुकसान झाले. हा अपघात माळुंग ते लवंग (ता . माळशिरस) येथे सोमवारी रात्रीच्या सुमारास घडला. या संदर्भात विकास गोपाळ भोसले (वय ३० रा. म्हाळुंग) या जखमी ड्रायव्हरने अकलूज पोलिसात तक्रार दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी एमएच ०५-इजे- २६६८ या क्रेनचा चालक विशाल भारत प्रजापती (रा. हवेली जि.पुणे) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माळुंग येथील चव्हाण यांची म्हैस मयत झाली होती. ती म्हैस जेसीबीत भरून लवंग रोडवरील ओढ्याजवळ पुरण्यासाठी नेण्यात आले होते. खड्डा खणून म्हैस पूरत असताना पुढील क्रमांकाचा क्रेन धडकल्याने जेसीबीचा चालक जखमी झाला. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार चंदनशिवे पुढील तपास करीत आहेत.

## गाय चोरल्याप्रकरणी ४ आरोपींना अटक

✔ **मंगळवेढा** : चोरीच्या गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्या आरोपीकडून गाय चोरल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी मंगळवेढाच्या पोलिसांनी चौघांना अटक करून चोरीस गेलेली ७० हजार रुपये किमतीची जर्सी गाय जप्त केली.

संकेत तानाजी ढगे (रा.निंबोनी), प्रदीप शामराव पाटील (वय २१), दत्तात्रय अण्णा पाटील, प्रणव दत्तात्रय पाटील ( सर्व रा. आष्टा जि.सांगली) अशी अटकेत असलेल्या आरोपींची नावे आहे. या चौघांनी मिळून २२जुलै रोजी पहाटेच्या सुमारास महमदाबाद हुन्नूर येथील ज्ञानू भुरुनुर यांच्या घरासमोर बांधलेली ७० हजार रुपये किमतीची जर्सी गाय चोरून नेली होती. पोलिसांनी दुसऱ्या एका गुन्ह्यात आरोपींना अटक केल्यानंतर गाय चोरल्याचे निष्पन्न झाले. हवालदार मोरे पुढील तपास करीत आहेत.

## भगवान नगरातील ड्रेनेजच्या पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात : आडम

### महिला शिष्टमंडळाने दिले आयुक्तांना निवेदन

✔ **सोलापूर** : सोलापूर पोलीस मुख्यालय शेजारी असलेली भगवान नगर झोपडपट्टीत पिण्याचे पाणी नळ जोडणी व ड्रेनिजचे मिश्रित होत आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याबाबत वारंवार विभागीय अधिकारी कार्यालयाकडे तक्रार करूनही दखल घेतली जात नाही. हे अत्यंत गंभीर आहे. नागरिक त्रस्त आणि प्रशासन सुस्त असल्याची टीका ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ.नरसय्या आडम मास्तर यांनी केली.



**सोलापूर : भगवान नगरातील समस्याबाबत निवेदत देताना नसीमा शेख व इतर.**

भगवान नगर येथील नागरिकांच्या वतीने सोलापूर महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांना ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ.नरसय्या आडम मास्तर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाद्वारे निवेदन देण्यात आले. यावेळी या शिष्टमंडळात माजी नगरसेविका नसीमा शेख,ॲड. अनिल वासम, वंदना भिसे, योगेश मार्गम , अंबादास बिंगी, आनंद कळसकर, मल्लेशम अल्ली, प्रशांत म्याकल, रवि केंचुगुंडी आदींची रेणुका गुंडला, सरस्वती कमुर्ती, उपस्थिती होती. यावेळी माजी नगरसेविका नसीमा शेख यांनी सादर समस्या बाबत आयुक्तांनी हस्तक्षेप करून ड्रेनेज तातडीने दुरुस्ती करून पिण्याचे पाणी जलवाहिनी व मलनिस्सारण वाहिनी या दोन स्वतंत्र लाईन करण्याची मागणी केली.

## सद्‌भावना तिरंगा केंद्रास आजपासून प्रारंभ



✔ **सोलापूर** : स्वातंत्र्य महोत्सवानिमित्त सद्भावना तिरंगा व मिठाई केंद्र दि. १३ ते १५ ऑगस्ट २०२४ पर्यंत सद्भावना तिरंगा बंगला, हॉटेल सिटी पार्कच्या मागे उपलब्ध राहणार आहे, अशी माहिती सद्भावना सेवा दलाचे प्रमुख दिव्यकांत गांधी यांनी पत्रकार परिषदेत दिली. या तिरंगा केंद्रावर तिरंगा ध्वज, ओढणी शेला, टी-शर्ट, पगडी , बॅच यासह १६ नमुन्यांचे तिरंगा वस्तू उपलब्ध आहेत. ड्रायफूट, तिरंगा बर्फी , केशर लाडू,, मसाला ड्रायफ्रूट, चिवडा यासह विविध पदार्थ मिळणार आहेत. मागणीप्रमाणे बनविण्यात आलेली फायबरची तीन ते ३.५० फुटाची आकर्षक भारत मातेची मूर्तीही इथे उपलब्ध होणार आहे. १५ ऑगस्ट रोजी भारत माता मूर्तीचे पूजन करण्यात येणार आहे. त्यानंतर दि. २० ऑगस्ट रोजी वंचित, उपेक्षित घटकांना घराघरांमध्ये लाडू वाटप करण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस ध्रुवेश गांधी , सोना गांधी, स्मृती गांधी, समृद्धी निम्बर्गी , नारायण छाबरीया, प्रकाश लोढा आदी उपस्थित होते.

## वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन

✔ **सोलापूर** : येथील जुळे सोलापूर भागातील जुळे सोलापूर ब्रह्म सेवा संघातर्फे रविवार दिनांक १८ ऑगस्ट रोजी वधु वर परिचय मेळावा आणि परिचय पुस्तिकेचे प्रकाशन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती ब्रह्मसेवा संघाचे डी. डी. कुलकर्णी यांनी दिली आहे.

हा कार्यक्रम दुपारी दोन ते पाच या वेळेत आदर्श मंगल कार्यालय चाटी अनाथ विद्यार्थी गृह, डफरीन चौक या ठिकाणी होणार आहे. या मेळाव्याच्या निमित्ताने काढण्यात येणाऱ्या पुस्तिकेमध्ये सुमारे आठशे वधू-वरांची नावे समाविष्ट करण्यात येणार आहेत. पुस्तिकेमध्ये सोलापूर शहर जिल्हा, विजयपूर, गुलबर्गा, पुणे अशा विविध भागातून वधू-वरांनी नाव नोंदणी केली आहे वधू-वरांनी तसेच त्यांच्या पालकांनी या मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन डी. डी. कुलकर्णी यांनी केले आहे.

## कोयत्याने केळीचे झाडे तोडून २ लाखांचे नुकसान

### शेलगाव वांगी येथील घटना

✔ करमाळा/प्रतिनिधी

भावकीतील पूर्वीच्या भांडणातून शेतातील केळीचे धड कोयत्याने तोडून दोन ते अडीच लाखाचे नुकसान करण्यात आले. ही घटना शेलगाव वांगी (ता. करमाळा) येथे शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणात विठ्ठल साहेबराव कोंडलकर (वय ५८ रा.शेलगाव वांगी ता.करमाळा) यांनी करमाळा पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी हिरालाल धोंडीबा कोंडलकर त्याची मुले नामदेव कोंडलकर आणि विठ्ठल कोंडलकर (तिघे रा.शेलगाव वांगी) या तिघा विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे . त्या तिघांनी मिळून शुक्रवारी रात्री १० वाजेच्या सुमारास विठ्ठल कुंडलकर यांच्या शेतात घुसून सुमारे २५० चे ३०० केळी पिकाचे धड कोयत्याने तोडले. त्यात आर्थिक नुकसान झाल्याची नोंद पोलिसात झाली आहे. हवालदार बाळसराफ पुढील तपास करीत आहेत.

## आलेगाव येथे शेतीच्या वादातून केबलने मारहाण


✔ **सोलापूर** : भावकितील शेतजमिनीच्या वादातून सळई, केबल आणि काठीने केलेल्या मारहाणीत दोघेजण जखमी झाले. ही घटना आलेगाव (ता.सांगोला) येथे रविवारी सकाळच्या सुमारास घडली. जालिंदर बाळासाहेब बाबर (वय ७५) आणि त्यांचे सहकारी हे दोघे ट्रॅक्टर घेऊन स्वतःच्या शेतात नांगरणी करीत होते .त्यावेळी त्यांचा भाऊ तानाजी बाबर त्याची दोन मुले धनाजी आणि बालाजी बाबर (सर्व रा.आलेगाव) या तिघांनी मिळून त्यांना शिवीगाळ करीत मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार नलावडे पुढील तपास करीत आहेत.

# झुकलेल्या विजेच्या खांबामुळे नागरिकांच्या जीवाला धोका

## देशमुख पाटील वस्तीतील प्रकार

✔ सोलापूर/प्रतिनिधी

देशमुख पाटील वस्ती येथील खालच्या बाजूच्या परिसरात सतत सुटणाऱ्या वादळी वारे आणि पावसामुळे विजेचा पोल एका बाजूला झुकले आहेत. हा पोल कधीही खाली पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. हा पोल काढून टाकण्याची मागणी होत आहे.



**सोलापूर : देशमुख पाटील वस्तीतील हाच तो झुकलेला विजेचा पोल.**

देशमुख पाटील वस्तीत १५ ते २० कुटुंब राहतात. अनेकांच्या घरात लहान बालके आहेत. दुपारच्या सुमारास हे बालके पोलच्या अवती-भवती ये-जा करत असतात. या ठिकाणी विजेचा पोल एका बाजूला झुकला आहे. तेथून ये-जा करणाऱ्या लोकांच्या अंगावर पडून मोठी दुर्घटना होवू शकते. या संदर्भात स्थानिकांनी संबंधित खात्याकडे तक्रार करून महावितरण तरी देखील दुर्लक्ष करत आहे. नागरिकांकडून विजेचा पोल हटविण्याची मागणी होत आहे.

### मोठी दुर्घटना होण्याची शक्यता

दहा वर्षांपूर्वी महावितरणकडून हा विजेचा पोल बसवण्यात आला आहे. त्यावेळेस पाया भरणी योग्य पद्धतीने न झाल्याने नागरिकांना आता त्रास सहन करावा लागत आहे. या भागात मातीचे रान असल्यामुळे पावसाळ्यात चिखल व पाणी साचून हा पोल एका बाजूला झुकला आहे. या आवारात लहान- लहान बालके खेळत असतात. खाब अंगावर पडून मोठी दुर्घटना होवू शकते.



विजेचे खांब धोकादायक अवस्थेत उभे असल्याने ते तातडीने काढावेत. वस्तीतील नागरिकांडून विजेचे खांब हटविण्याची मागणी सातत्याने केली जात आहे. याकडे महावितरण याकडे दुर्लक्ष करत आहे. जीवित धोका झाल्यास महावितरणच जबाबदार असणार आहे.

**-मैनाबाई कांबळे, स्थानिक रहिवासी**

# ‘मध्य’ची जागा शिवसेना जिंकून आणण्याची ग्वाही द्या

## प्रभारी विजय चौगुले यांचे शिवसैनिकांना आवाहन

✔ सोलापूर/प्रतिनिधी



खोट्या अफवा पसरवून लोकसभेला विरोधकांनी मते खेचण्याचे प्रकार केले. लोकसभेला जे झाले ते विधानसभेला होऊ नये, यासाठी शिवसैनिकांनी मतदारांचे बळ मिळवावे. घरोघरी जाऊन संपर्क साधला पाहिजे. निवडून येण्याचे मेरीट दाखविले तर शहर मध्यची जागा शिवसेना जिंकून आणेल, अशी ग्वाही शिवसैनिकांनी दिली पाहिजे, असे आवाहन शिवसेना ठाणे जिल्हा प्रमुख तथा शहर मध्यचे प्रभारी विजय चौगुले यांनी केले.

शिवछत्रपती रंगभवन येथे सायंकाळी शिवसेना पदाधिकारी आढावा बैठक व पक्षप्रवेश कार्यक्रम झाला. त्यात ते बोलत होते. चौगुले म्हणाले, कोणत्याही परिस्थितीत महायुतीची ताकद वाढवली पाहिजे. यापूर्वीही सोलापुरातून शिवसेनेचे आमदार निवडून गेलेले आहेत. सोलापुरात शिवसेनेने आपल्या कामाचा ठसा उमटवलेला आहे. शिवसैनिक म्हणून महायुतीचे कार्य तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कार्य घरोघरी पोहोचवायचे आहे.

राज्य प्रवक्त्या ज्योती वाघमारे म्हणाल्या, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत राज्यात १ कोटी ४७ लाख फॉर्म मंजूर झाले आहेत. महिलांच्या या सन्मान योजनेला चांगला प्रतिसाद मिळाला. येत्या राखी पौर्णिमेनिमित्त या प्रत्येक महिलांच्या खात्यात तीन - तीन हजार रूपये मिळणार आहेत. जेथे महिलांचा सन्मान होतो तो हा महाराष्ट्र आहे. यावेळी शिवसेनेचे संपर्क प्रमुख शिवाजी सावंत, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, मनोज शेजवाळ, युवासेनेचे जिल्हाप्रमुख उमेश गायकवाड यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.